सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | शुक्रवार, दि. २५ जुलै २०२५ | वर्ष - तिसरे | अंक ११३ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com




## अनिल अंबानी यांच्यावर देशभरात ३५ हून अधिक ठिकाणी ईडीचे छापे

मुंबई : अनिल अंबानी प्रणित रिलायन्स इंडस्ट्रीजच्या विविध ठिकाणावर अंमलबजावणी संचालनालय या नियामक संस्थेने छापे टाकले आहेत. माध्यमांच्या माहितीप्रमाणे देशभरातील ३५ प्रांगणात, ५० कंपनी संबंधित व्य क्तींच्या स्थानांवर छापे घालण्यात आले आहेत. माध्यमांच्या माहितीप्रमाणे, सध्या अनिल अंबानी यांच्या गाजत असलेल्या मनीलॉँड्रिंग प्रकरणाच्या चौकशीने यानिमित्ताने वेग घेतला आहे. कंपनीने मिळवलेल्या कर्ज अनैतिक प्रकारे दुसऱ्या कारणांसाठी वळवण्यात आल्याचा गंभीर आरोप रिलायन्सवर करण्यात आला होता. मुकेश अंबानी यांनी २०१७ ते २०१९ या काळात कंपनीसाठी येस बँकेकडून ३००० कोटींचे कर्ज घेतले होते जे अपेक्षित कारणापेक्षा वेगळ्याच कारणासाठी वापरण्यात आल्याचा ठपका ईडीने कंपनीवर ठेवला आहे. सुत्रांच्या माहितीनुसार, कंपनीवर हा देखील आरोप आहे की कंपनीने कर्जाच्या अनैतिक वापरासह बँकेच्या कर्मचाऱ्यांना कर्जासाठी कथित प्रकरणात लाच दिली. यामुळे अनिल अंबानींच्या कंपनीचे धाबे दणाणले असून यावर ईडीची कारवाई सुरु आहे. याप्रकरणी आवश्यक ती सखोल



माहिती घेऊन ईडी कंपनीवर कारवाई करण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

ईडीच्या प्राथमिक तपासात बँका, भागधारक, गुंतवणूकदार आणि इतर सार्वजनिक संस्थांची फसवणूक करून सार्वजनिक पैसे वळवण्यासाठी सुनियोजित आणि विचारपूर्वक योजना आखल्याचे उघड झाले आहे. येस बँक्स लिमिटेडच्या प्रवर्तका (Promoter) स ह बँक अधिकाऱ्यांना लाच देण्याचा गुन्हा देखील तपासाधीन आहे असे सूत्रांनी सांगितले.' कर्ज मंजूर होण्यापूर्वीच, येस बँकेच्या प्रवर्तकांना त्यांच्या संबंधित पैसे मिळाले असे आढळून आल्याचे सूत्रांनी म्हटले आहे.अनिल अंबानी समूहाच्या कंपन्यांविरुद्धच्या चौकशीत गुप्तहेरांना सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (SEBI), नॅशनल हाऊसिंग बँक (NHB), डएइख, नॅशनल फायनान्शियल रिपोर्टिंग अथॉरिटी (NFRA) आणि बँक ऑफ बडोदा यासारख्या इतर एजन्सी आणि संस्थांकडून मदत मिळत आहे असेही सुत्राने प्रसारमाध्यमांना स्पष्ट केले.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार,ईडीला संशयास्पद आर्थिक पद्धतींचा एक पॅटर्न आढळला आहे जसे की खराब किंवा पडताळणी न केलेल्या ढिसाळ वित्तीय कामगिरी असलेल्या कंपन्यांना कर्ज देणे, सामान्य संचालक आणि पत्ते असणे, आवश्यक कागदपत्रे गहाळ होणे मंजूर फायली गायब असणे,अग्रभागी कंपन्यांना निधी धुणे असे अनेक गंभीर आरोप कंपनीवर करण्यात आले आहेत.

सेबीने ईडीला कळवले आहे की त्यांच्या एका कंपनीने, रिलायन्स हाऊसिंग फायनान्स लिमिटेडचा (RHFL) आर्थिक घोटाळ्यात सहभागी असल्याचा आरोप सेबीन केला आहे. यासंबंधीची माहिती सेबीने ईडीला दिली आहे. कथित प्रकरणात आरएचएफएलने कॉर्पोरेट कर्जांमध्ये २०१७-१८ आर्थिक वर्षात घेतलेले कर्ज ३७४२.६० कोटी रुपयांवरून २०१८-१९ च्या आर्थिक वर्षात ८६७०.८० कोटी रुपयांपर्यंत कसे गेले याविषयी संशयास्पद हालचालीवर व अनियमितेवर ईडी तपास करणार आहे ज्यामध्ये अनियमित आणि ज लद मंजुरी, प्रक्रियेतील विचलन यासारख्या अनेक बेकायदेशीर बाबी आढळून आल्या आहेत, असे सुत्रांनी प्रसारमाध्यमांना सांगितले आहे.

स्टेट बँक ऑफ इंडिया (SBI) ने देखील RAAGA कंपनी, रिलायन्स कम्युनिकेशन्स (RCom) आणि स्वतः अंबानी यांना 'फसवणूक' खात्यांपैकी एक म्हणून वर्गीकृत केले होते ज्यावर अनिल अंबानी यांनी नाराजी व्यक्त करत न्यायालयात धाव घेतली होती व न्या यालयाने अनिल अंबानी यांच्या रिलायन्सला आपले मांडण्याचा पुरेसा वेळ एसबीआयने द्यायला हवा असे ताषेरे एसबीआयवर ओढले होते. त्यावरही अधिक तपास नियामक मंडळाकडून सुरु आहे.
















## हायकोर्टाच्या निकालाला 'सर्वोच्च' स्थगिती, आरोपींनां पुन्हा तुरुंगात पाठवणार?

मुंबई : मुंबई रेल्वे साखळी स्फोट प्रकरणाची अतिशय मोठी बातमी समोर आली आहे. मुंबईतील २००६ सालच्या साखळी बॉम्बस्फोट प्रकरणी मुंबई हायकोर्टाने दिलेल्या निकालाला सुप्रीम कोर्टाने स्थगिती दिली आहे. हायकोर्टाकडून दोनच दिवसांपूर्वी २१ जुलैला निर्णय देताना १२ आरोपींची निर्दोष सुटका करण्यात आली होती. त्याला महाराष्ट्र सरकारने सुप्रीम कोर्टात आव्हान दिलं होतं. राज्य सरकारकडून महाधिवक्ते तुषार मेहता यांनी बाजू मांडली. २००६ साली मुंबईत लोकल ट्रेनमध्ये झालेल्या साखळी बॉम्बस्फोटात अनेक निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाला होता. या प्रकरणात अनेकांना दोषी ठरवण्यात आले होते. यानंतर याप्रकरणी दोषींनी या शिक्षेला उच्च न्यायालयात आव्हान दिले होते तर राज्य सरकारने फाशीच्या शिक्षेवर शिक्कामोर्तब करण्यासाठी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. गेल्या ६ महिन्यांपासून यावर सुनावणी सुरू होती.पण या निर्णयाचा परिणाम इतर मकोका खटल्यांवर होऊ शकतो. हा निर्णय इतर खटल्यांमध्ये वापरलं जाईल आणि त्याचा फटक पोलीस तपास आणि अन्य यंत्रणांना बसू शकतो. त्यामुळे सुप्रीम कोर्टाने सध्या हायकोर्टाच्या निर्णयाला स्थगिती दिली.

### सर्वोच्च न्यायालयाची नोटीस

उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरोधात महाराष्ट्र सरकारने दाखल केलेल्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने नोटीस जारी केली आहे. या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाच्या निर्णयावर तात्पुरती स्थगिती दिली आहे. कोर्टाने स्पष्टपणे सांगितले की, जे आरोपी या प्रकरणात पूर्वीच निर्दोष ठरवले गेले आहेत आणि आता जामिनावर किंवा मुक्त झाले आहेत, त्यांना पुन्हा तुरुंगात पाठवले जाणार नाही. सध्या या प्रकरणातील पुढील सुनावणीची प्रतीक्षा असून सर्वोच्च न्यायालयाने संबंधित सर्व पक्षकारांना नोटीस बजावून आपली बाजू मांडण्यास सांगितले आहे.

### साखळी स्फोटात २०९ जणांचा मृत्यू

मुंबईतील लोकल ट्रेनमध्ये ११ जुलै २००६ रोजी ११ मिनिटांत झालेल्या ७ स्फोटांनी मुंबई हादरली होती. या साखळी बॉम्बस्फोटात २०९ जणांचा मृत्यू झाला होता. तर ८०० हून अधिकजण जखमी झाले होते. २०१५साली विशेष न्यायालयाने याप्रकरणातील १२ आरोपींना दोषी ठरवत पाच जणांना फाशी आणि सात जणांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. या शिक्षेला आरोपींनी उच्च न्यायालयात आव्हान दिले होते.

## कुरुंधाच्या केळीची विदेशात मागणी : बाळासाहेब कोथनगीरे



कुरूंदा, २४ जुलै

हिंगोली जिल्ह्यातील वसमत तालुका सिद्धेश्वर धरण व ईसापुर धरणाचे पाणी भेटत असल्यामुळे मोठ्या प्रमाणात बागायती शेती करण्यासाठी ओळखला जातो. या भागात बागायती म्हणून ऊस, हळद आणि केळी हे पीक मोठ्या प्रमाणात घेतल्या जाते. या भागात बागायती पीक म्हणून केळीची सुद्धा लावगड मोठ्या प्रमाणात केल्या जाते.

मागच्या दोन-तीन वर्षांपूर्वी केळीला योग्य भावात मिळत नव्हता परंतु मागील तीन वर्षापासून केळीला चांगला भाव मिळत असल्यामुळे या भागातील शेतकरी केळी पिकाकडे मोठ्या प्रमाणात वळला आहे. या भागातील केळी थेट विदेशात मागणी असल्यामुळे बरेच शेतकरी उच्च दर्जाची केळी पिकवण्याकडे वळला आहे.

कुरुंदा येथील शेतकरी बबनराव शिवाजीराव इंगोले यांनीही आपल्या शेतात पाच हजार केळीची लागवड केली व योग्य नियोजन करून उच्च दर्जाचे केळी पीक घेतले. केळीचे योग्य नियोजन केल्यामुळे त्यांची केळी अत्यंत दर्जेदार असल्यामुळे व्यापार्यांकडून त्यांच्याकडे थेट विदेशात पाठवण्यासाठी फोन येऊन २४०० रुपये प्रति क्विंटल भाव देऊन मागणी करण्यात आली. त्यांनीही चांगला भाव भेटत असल्यामुळे व्यापार्यांशी सौदा करून देवाण-घेवाण केली. यापुढे या भागातील शेतकर्यांनी मोठ्या प्रमाणात केळी लागवड करून चांगल्या प्रतीची केळी पिकवून थेट विदेशात केळी पाठवण्यासाठी इतर शेतकर्यांना सुद्धा प्रोत्साहित करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसानिमित्त नळेगाव येथे रक्तदान शिबिर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२४ जुलै -**
राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त नळेगाव येथे रक्तदान शिबिर संपन्न झाले. यावेळी शेकडो कार्यकर्त्यांनी रक्तदान करून मुख्यमंत्र्यांना शुभेच्छा व्यक्त केल्या.



नळेगाव मंडळाचे तालुकाध्यक्ष रणजीत मिरकले पाटील, बाजार समितीचे सभापती निळकंठ मिरकले, जिल्हा परिषदेचे माजी समाज कल्याण सभापती रोहिदास वाघमारे, भाजप नेते शाम मुंजाने, नगरसेवक नितीन रेड्डी, सुनील पाटील, नळेगाव शहराध्यक्ष गजानन बिराजदार यांच्या प्रमुख उपस्थितीत या शिबिराचे उद्घाटन झाले. यावेळी उपस्थित मान्यवरांनीही रक्तदान केले.

याप्रसंगी बालाजी सावंत,डॉ. वळसंगकर, अशोक चिंते,विशाल भोसले,कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक अजय काळे, मदनराव गायकवाड,विकास गुरमे, लातूर रोडचे सरपंच घनश्याम मस्के, युवा नेते ग्रामपंचायत सदस्य परमेश्वर नरहरे, पांडुरंग शिंदाडकर,तुकाराम डोंगरे, दिनेश नरहरे, सुमित गुडे, चंदू कांबळे, शिवम देवशटवार, वीरेंद्र पांडे,अशोक नागिने, लक्ष्मण पोटे, अल्लापुरे, चेअरमन दत्ता गायकवाड, संजय बिराजदार, गणेश जाधव,किशोर मिरकले, कुलकर्णी, अनिल जोशी, बाळू शिंदे, विनायक साबदे, तुकाराम कापसे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.



### संक्षिप्त वृत्त...

## शक्तिपीठ महामार्गाला शेतकऱ्यांचा विरोध

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२४ जुलै -**
लातूर तालुक्यातील रामेश्वर व बोपला आणि औसा तालुक्यातील अंदोरा येथील शेतकऱ्यांनी मंगळवारी शक्तिपीठ महामार्गाची संयुक्त मोजणी व सीमांकन प्रक्रिया बंद पाडून महामार्ग रद्द करण्याची प्रशासनाला विनंती केली.

जिल्ह्यात शक्तिपीठ महामार्गाची नियोजित वेळापत्रकानुसार संयुक्त मोजणी व सीमांकनासाठी बाधित गावांत पथके जात असून, या पथकांना शेतकरी तीव्र विरोध करीत आहेत. त्यामुळे मोजणी प्रक्रिया सुरुळीतपणे पार पडली नाही. मंगळवारी औसा तालुक्यातील अंदोरा येथे व लातूर तालुक्यातील रामेश्वर येथे मोजणीस आलेल्या अधिकाऱ्यांच्या पथकासमोर शेतकऱ्यांनी आपली नापसंती दर्शविली. बोपला येथेही शेतकऱ्यांनी मोजणीस विरोध केल्याने पथक माघारी परतले. यावेळी मांजरी, कासारजवळा, ढोकी, दिंडेगाव, गांजूर आदी गावांतील शेतकरी उपस्थित होते.

## राजमाता जिजामाता संकुलातील नेत्र तपासणी शिबिरास प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२४ जुलै -**
लायन्स नेत्र रुग्णालय, उदगीर आणि राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुल यांच्या संयुक्त विद्यमाने राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांच्या ६९व्या वाढदिवसाचे औचित्य साधून बुधवारी मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

राजमाता जिजामाता विद्यालयात झालेल्या या शिबिराच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या अध्यक्ष के. ए. जायेभाये होत्या. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून लायन्स नेत्र रुग्णालय, उदगीरचे डॉ. महेश समगे व डॉ. श्रीकांत सावंत यांची उपस्थिती होती. यावेळी संस्थेचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, उपप्राचार्या कविता केंद्रे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, समन्वयक अश्विनी केंद्रे, प्रा. वैशाली केंद्रे, करिष्मा केंद्रे, राजेंद्र जायेभाये, प्राचार्य जी. आर. मुंडे, शैक्षणिक समन्वयक राजीव मुंढे, राणी केंद्रे यांची प्रमुख उपस्थिती होती.

## पानगाव उपबाजार पेठेमुळे शेतकऱ्यांना मिळणार मोठा आधार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२४ जुलै -**
जिल्हा बँकेचे अध्यक्ष धिरज देशमुख यांच्या सुचनेनुसार रेणापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती उमाकांत खलंग्रे, उपसभापती ॲड. शेषराव हाके पाटील, संचालक प्रकाश सुर्यवंशी, विश्वनाथ कागले यांनी दि. २३ जुलै रोजी पुणे येथे पणन सहसंचालक यांची भेट घेतली व प्रस्तावित पानगाव उपबाजारपेठ आराखड्या संदर्भात चर्चा केली. यावेळी पणन सह संचालकांनी सकारात्मक प्रतिसाद दिला.

लोकप्रतिनिधी म्हणून काम करत असताना जिल्हा बँकेचे अध्यक्ष धिरज देशमुख सातत्याने ग्रामीण भाग व शेतकरी हित डोळ्यासमोर ठेवून काम केले आहे. लातूर ग्रामीण मधील विकासाला डोळ्यासमोर ठेवून रेणापूर कृषी उत्पन्न बाजार समितीची उपबाजारपेठ पानगाव येथे सुरू होण्याच्या दृष्टीने त्यांचे प्रयत्न सुरू आहेत.याच अनुषंगाने धिरज विलासराव देशमुख यांच्या सुचनेनुसार रेणापूर बाजार समितीचे पदाधिकारी यांनी पणन सह संचालक,महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ पुणे यांची भेट घेतली व विकास आराखड्या संदर्भात सविस्तर चर्चा केली.

## दिव्यांगांना सेवा देऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस साजरा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२४ जुलै -**
मुस्लिम वेल्फेअर असोसिएशन आणि दिव्यांग हक्क स्वाभिमानी प्रतिष्ठान लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस आगळ्या वेगळ्या पद्धतीने साजरा करण्यात आला.

दिव्यांग व्यक्तींना महाराष्ट्र शासनाच्या वतीने २५०० रुपये मानधन देण्याची योजना प्रमाणपत्र या कार्यक्रमात वितरित करण्यात आले. दिव्यांगांच्या सोयी सुविधा करिता आवश्यक असणाऱ्या कागदपत्राची पुर्तता तात्काळ पूर्ण व्हावी म्हणून ऑनलाइन व आवश्यक कागदपत्राच्या माहितीची जनजागृती या कार्यक्रमात करण्यात आली.

# ... अन्यथा शुक्रवारनंतर तीव्र लढा

### सकल मराठा समाजाचा बैठकीत इशारा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२४ जुलै -**
छावा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष विजयकुमार घाडगे यांच्यावरील झालेला हल्ला हा प्राणघातक असून, प्राणघातक हल्ल्याचे कलम वाढवून सर्व आरोपींना अटक करण्यात यावी, घाडगे यांचा पुरवणी जवाब घ्यावा आणि सुनील तटकरे यांना आरोपी करावे, अशी मागणी पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. तसेच कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांना शुक्रवार, २५ जुलैपर्यंत बडतर्फ करावे, अशी मागणी शासनाकडे करण्यात आली आहे.

याबाबत कारवाई नाही झाल्यास शुक्रवारनंतर सनदशीर आणि कायदेशीर लढा तीव्र करण्यात येईल, असा इशारा सकल मराठा समाजाच्यावतीने देण्यात आला आहे.

छावा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष विजयकुमार घाडगे मारहाण प्रकरणातील मुख्य संशयित सूरज चव्हाण याच्या सुटकेनंतर सकल मराठा समाजाची बैठक पार पडली. यावेळी सांगण्यात आले की, विजयकुमार घाडगे यांनी सुनील तटकरे यांना दिलेले निवेदन हे लोकशाही मार्गाने होते. असे असताना सुनील तटकरे यांच्या सांगण्यावरूनच आणि त्यांनी रचलेल्या कटाप्रमाणे प्रदेशाध्यक्षांचा अपमान झाल्याचा राग मनात धरून विजयकुमार घाडगे यांना जीवे मारावे याच मुख्य उद्देशाने सूरज चव्हाण व त्याच्या साथीदारांनी विश्रामगृहात फायटर, लाथा-बुक्क्या, हातातील लोखंडी कडे याचा वापर करून, तसेच कोपराने घाडगे यांच्या मानेवर जबर मारहाण केली. घाडगे यांच्या चेहऱ्यावर आणि डोळ्यावरही जबर मारहाण केली. मानेचा भाग हा शरीराचा नाजूक भाग असतो. त्यावरच केलेली मारहाण म्हणजे विजयकुमार घाडगे यांना जीवे मारण्याचा प्रयत्न होता. म्हणून विवेकानंद चौक पोलीस ठाण्यात दाखल केलेल्या गुन्ह्यातील कलमे अपुरी आहेत. विजयकुमार घाडगे यांचा पुरवणी जवाब घेण्यात यावा, जीवे मारण्याचा प्रयत्न कलम १०९ आणि कट रचने कलम ६१ वाढवण्यात यावे, आरोपींना अटक करावी, या प्रकरणात सुनील तटकरे यांना आरोपी करावे, कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांना येत्या शुक्रवारपर्यंत बडतर्फ करावे, अन्यथा शुक्रवारनंतर सनदशीर व कायदेशीर मार्गाने लढा तीव्र तीव्र करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. या बैठकीस ॲड. उदय गवारे, नेहरू देशमुख, हंसराज जाधव, डी. एस. पाटील, ॲड. जैनू शेख, ॲड. चंद्रकांत मेटे, डॉ. अमित पाटील, नानासाहेब जाधव, ॲड देविदास बोरुळे, ॲड. भालचंद्र पाटील, दत्ता टेकाळे, ॲड. योगेश शिंदे, ॲड. ए. व्ही. चव्हाण, ॲड. हरी निटुरे, वैजनाथ जाधव आदींची उपस्थिती होती.

## सदोष, नादुरुस्त मीटर तातडीने बदला; संचालक लोकेश चंद्र

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२४ जुलै -**
मराठवाड्यात वीज वितरण यंत्रणेच्या विस्तारीकरण व सक्षमीकरणाची कामे वेगाने सुरू आहेत. त्यामुळे सर्व वीज ग्राहकांना सुरळीत व दर्जेदार वीजपुरवठा देण्याच्या सेवेत कोणतीही हयगय खपवून घेतली जाणार नाही असा इशारा महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी दिला. अचूक बिलिंगसाठी नादुरुस्त व सदोष व वीजमीटर तातडीने बदलण्यात यावेत तसेच प्रत्येक महिन्याला वसूलीचे उदिदष्ट १०० टक्के पूर्ण करावे असे निर्देश त्यांनी बुधवारी दिले.

येथील शासकीय विश्रामगृहात छत्रपती संभाजीनगर, नांदेड व लातूर परिमंडलातील विविध कामे व योजनांसह प्रामुख्याने मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.०, मागेल त्याला सौर कृषिपंप योजनेचा लोकेश चंद्र यांनी आढावा घेतला. यावेळी सहव्यवस्थापकीय संचालक आदित्य जिवने, संचालक (संचालन/प्रकल्प) सचिन तालेवार, संचालक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पवार, कार्यकारी संचालक श्री. प्रसाद रेशमे व श्री. धनंजय औंढेकर, मुख्य अभियंते सर्वश्री अरविंद बुलबुले (लातूर), पवनकुमार कछोट (छ. संभाजीनगर), राजाराम माने (नांदेड) यांची प्रमुख उपस्थिती होती.

अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र म्हणाले, मराठवाड्यात विविध योजनांद्वारे प्रामुख्याने औद्योगिक वसाहती परिसरांसह शहरी व ग्रामीण भागात वीज वितरण यंत्रणेचे जाळे भक्कम करण्यात येत आहेत. ही कामे गतिमान व दर्जेदार होतील याकडे विशेष लक्ष देण्यात यावे. सुरळीत व दर्जेदार वीजपुरवठा करणे महावितरणची जबाबदारी आहे. यामध्ये कोणतीही हयगय खपवून घेतली जाणार नाही. काही कारणांनी वीज पुरवठा खंडित झाल्यास प्रथम पर्यायी स्वरूपात तसेच दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर करून खंडित विजेचा कालावधी कमीत कमी राहील याची दक्षता घ्यावी असे त्यांनी स्पष्ट केले.

ते पुढे म्हणाले की, महावितरणचे अस्तित्व हे वीजबिलांच्या महसूलावरच अवलंबून आहे. गेल्या तीन चार महिन्यांमध्ये महसूलाच्या उद्दिष्टाप्रमाणे बिलांची वसूली झालेली नाही, ही गंभीर बाब आहे. महावितरणच्या आर्थिक स्थैर्यासाठी वीजबिल वसूलीशिवाय अन्य पर्याय नाही. थकबाकी व चालू वीजबिलांचे उद्दिष्ट दरमहा पूर्ण करावे. तसेच जुन्या नादुरुस्त किंवा सदोष वीजमीटरमुळे महावितरण व ग्राहकांना आर्थिक फटका बसतो. असे जुने मीटर तातडीने बदलण्यात यावेत.

घरगुती ग्राहकांचे वीजबिल शून्यवत करणारी प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना, शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा करण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना, मागेल त्यांना सौर ऊर्जा कृषिपंप आदी प्रभावी अंमलबजावणी करणे व ग्राहकांना लाभ मिळवून देणे हे महावितरणमधील प्रत्येकाचे कर्तव्य आहे.

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेद्वारे सौरग्राम योजनेला मोठे पाठबळ मिळत आहे. स्थानिक लोकप्रतिनिधी व ग्रामस्थांच्या सहकार्याने या योजनेला आणखी गती द्यावी. स्वातंत्र्यदिनाच्या ग्रामसभांमध्ये या योजनेची माहिती द्यावी, असे ते म्हणाले.

# सोलापूर-लातूर-तिरुपती रेल्वे पुन्हा सुरू

### मराठवाडा जनता विकास परिषदेच्या पाठपुराव्याला यश

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२४ जुलै -**
मागील तीन वर्षांपासून सुरू असलेली सोलापूर - लातूर -तिरुपती रेल्वे वेळेचे गणित जुळत नसल्याचे कारण पुढे करून बंद करण्यात आली होती. मात्र, लातूर, धाराशिवच्या खासदारांसह मराठवाडा जनता विकास परिषद, दक्षिण मराठवाडा रेल्वे संघर्ष समिती व विविध सामाजिक संस्था, संघटनांनी आक्रमक भूमिका घेतल्याने पुन्हा तीन महिने मुदतवाढ देण्यात आली आहे. २५ सप्टेंबरपर्यंत या विशेष रेल्वेच्या दहा फेऱ्या होणार आहेत.

आठवड्यातून एक वेळा तिरुपतीला जाणारी ही विशेष रेल्वे १५ डिसेंबर २०२२ रोजी सुरू झाली होती. जवळपास तीन वर्षे सुरळीत चालल्यानंतर वेळेचे गणित, प्रवाशांचा अत्यल्प प्रतिसादाचे कारण देत जुलै महिन्यात बंद करण्यात आली होती. दर तीन महिन्यांनी मिळणारी मुदतवाढ जुलैमध्ये मिळाली नसल्याने प्रवाशांमध्ये ओरड सुरू झाली होती.



प्रवासी, भाविकांची मागणी लक्षात घेऊन पुन्हा सोलापूर, कुर्डवाडी, धाराशिव, लातूर, लातूर रोड, उदगीर, बिदरमार्गे तिरुपतीहून पुढे धर्मावरमपर्यंत ही रेल्वे जाणार आहे. यासाठी रेल्वेने वेळापत्रकही जाहीर केले आहे. सोलापूर येथून गुरुवारी रात्री ११.२० वाजता निघून लातूर स्थानकावर पहाटे ४.३० वाजता येईल. तिरुपतीला दुसऱ्या दिवशी शुक्रवारी रात्री १०.१० पोहोचणार आहे.

लातूर-तिरुपती-चेन्नई एक्स्प्रेस तत्काळ सुरू करा, लातूरहून पुण्याला सकाळी ७ वाजता थेट गाडी सुरू करावी, यासह अन्य मागण्यांसाठी दक्षिण मराठवाडा रेल्वे संघर्ष समिती, मराठवाडा जनता विकास परिषदेने दोन दिवसांपूर्वी आंदोलनाचा इशारा दिला होता. दरम्यान, लातूरचे खासदार डॉ. शिवाजी काळगे, धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर यांनी रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा केल्याने तिरुपती रेल्वे सुरू पुन्हा सुरू झाली आहे, असे मराठवाडा जनता विकास परिषदेचे अध्यक्ष शिवाजी नरहरे यांनी सांगितले.

# मुख्यमंत्री फडणवीस यांच्या वाढदिनी रक्त संकलन



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२४ जुलै -**
राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त लातूर शहर जिल्हा भाजपाच्या वतीने शहरातील विविध मंडलांमध्ये महारक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरास लातूरकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी साडेसहाशेंवर पिशव्या रक्त संकलन झाले. शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांच्या नेतृत्वात झालेल्या या शिबिरातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हातून राज्याच्या कल्याणासाठी कार्य व्हावे, अशा शुभेच्छा व्यक्त करण्यात आल्या.

या शिबिराच्या यशस्वीतेसाठी कार्यक्रम संयोजक म्हणून प्रमोद गुडे तर सहसंयोजक म्हणून ॲड. ललित तोष्णीवाल यांना नियुक्त करण्यात आलेले होते.

शहरातील आठही मंडलांमध्ये रक्तदान शिबिर यशस्वी व्हावे याकरीता मंडल निहाय समित्यांचे गठन करण्यात आलेले होते. शहर जिल्हांतर्गत असलेल्या श्री सिद्धेश्वर मंडल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मंडल, महात्मा बसवेश्वर मंडल, छत्रपती शिवाजी महाराज मंद, महर्षी स्वामी दयानंद सरस्वती मंडल, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर मंडल, छत्रपती संभाजीराजे मंडल, छत्रपती शाहू महाराज मंडल या मंडलांमध्ये विविध ठिकाणी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आलेले होते. त्याकरिता मंडल अध्यक्ष सुरेश जाधव, निर्मला कांबळे, राहूल भुतडा, रोहित पाटील, विशाल हावा पाटील, काकासाहेब चौगुले, सचिन सुरवसे, गोपाळ वांगे यांनी मंडलनिहाय संयोजकांची नियुक्ती केली होती. शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर व अर्चना पाटील चाकूरकर यांच्या हस्ते प्राथमिक स्वरुपात या महारक्तदान शिबिराचे महात्मा बसवेश्वर मंडल अंतर्गत वीर हनुमंत वाडी येथे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी अजित पाटील कव्हेकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राच्या विकासासाठी आणि लोककल्याणासाठी ध्यास घेऊन काम करत असल्याचे सांगून त्यांच्या नेतृत्वात महाराष्ट्राच्या विकासाची घोडदौड वेगाने सुरु असून लवकरच महाराष्ट्र देशातील एक नंबरचे विकसीत राज्य निर्माण होईल असा विश्वास व्यक्त केला. त्यांनी समाजहिताला प्राधान्य दिल्यामुळेच त्यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी जोपासत रक्तदान शिबिराचे आयोजन केले असून या शिबिराच्या माध्यमातून लातूर राज्यात प्रथम क्रमांकावर असेल असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

### 'छावा'चे विजयकुमार घाडगे मारहाण प्रकरण

# पहाटेच कायदेशीर सोपस्कार पूर्ण; सूरज चव्हाण पोलीस ठाण्याबाहेर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२४ जुलै -**
'छावा'चे प्रदेशाध्यक्ष तथा शेतकरी नेते विजयकुमार घाडगे मारहाण प्रकरणातील मुख्य संशयीत सूरज चव्हाण हा बुधवारी पहाटे विवेकानंद चौक पोलिसांना शरण आला. त्याच्यावर गुन्ह्यात लावण्यात आलेली कलमे अधिक प्रभावशाली नसल्याने अवघ्या काही मिनिटात कायदेशीर सोपस्कार पूर्ण करून, चव्हाण पोलीस ठाण्याबाहेर पडला.



राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्या रविवारच्या विश्रामगृहात आयोजित पत्रकार परिषदेनंतर 'छावा'चे प्रदेशाध्यक्ष विजयकुमार घाडगे व त्यांच्या सहकाऱ्यांनी तटकरे यांची भेट घेऊन कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांचा राजीनामा घ्यावा, याबाबतचे निवेदन दिले. दरम्यान, घाडगे व त्यांचे सहकारी विश्रामगृहातील खालच्या मजल्यावरील खोलीत बसले असता, घाडगे यांना सूरज चव्हाण व राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी बेदम मारहाण केली. याप्रकरणी विजयकुमार घाडगे यांच्या फिर्यादीवरून विवेकानंद चौक पोलीस ठाण्यात सूरज चव्हाण याच्यासह लाला सुरवसे, शुभम रेड्डी, अमित क्षीरसागर, ताज शेख, अभिजित सगरे, सिद्दीक मुल्ला, अहमद शेख, वसीम मुल्ला, रवी धुमाळ व राजू बुरगे या ११ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यातील ८ जणांना अटक करण्यात आली असून, अन्य आरोपींच्या शोधासाठी पोलीस पथके तैनात करण्यात आली होती. विजयकुमार घाडगे मारहाण प्रकरण गाजत आहे. सूरज चव्हाणला अटक करावी म्हणून घटनेच्या पहिल्या दिवसापासून राज्यभरात आंदोलन, रास्तारोको, मोर्चे काढण्यात येत आहेत. दरम्यान, बुधवारी पहाटे सूरज चव्हाण हा विवेकानंद चौक पोलीस ठाण्यात शरण आला. सूरज चव्हाण याच्यावर लावण्यात आलेली कलमे अधिक प्रभावशाली नसल्याने कायदेशीर प्रक्रिया पूर्ण अवघ्या काही मिनिटांत सूरज चव्हाण पोलीस ठाण्याबाहेर पडला. सूरज चव्हाणला जामीन दिला का, सोडून दिले का? असा प्रश्न पोलीस प्रशासनाला विचारला असता, अटकच नाही तर सोडून देण्याचा, जामीन देण्याचा प्रश्नच नाही, असे सांगण्यात आले.

# आमदार अमित देशमुख यांनी घेतली विजयकुमार घाडगेंची भेट

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२४ जुलै -**
माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांनी येथील अपोलो रुग्णालयात उपचार घेत असलेले छावा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष विजयकुमार घाडगे यांची भेट घेऊन त्यांच्या प्रकृतीची चौकशी केली. त्यांच्यावर सुरू असलेल्या उपचाराबद्दलही डॉक्टरांशी चर्चा करून माहिती घेतली. घाडगे यांना प्रकृतीची काळजी घेण्यास सांगून, लवकरात लवकर बरे व्हाल, अशा सदिच्छा त्यांनी व्यक्त केल्या.



राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्यासमोर छावा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी पत्त्याची पाने फेकून कृषीमंत्री माणिकराव ठाकरे व राष्ट्रवादीचा निषेध केला. यावेळी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सूरज चव्हाण व त्यांच्या कार्यकर्त्यांनी विजयकुमार घाडगे व त्यांच्या कार्यकर्त्यांना बेदम मारहाण केली. या मारहाणीनंतर येथील अपोलो रुग्णालयात घाडगे व त्यांचे सहकारी उपचार घेत आहेत.

आमदार अमित देशमुख यांनी रुग्णालयात जावून घाडगे व त्यांच्या सहकाऱ्यांना भेटून धीर दिला. आंदोलन करणाऱ्या कार्यकर्त्यांना मारहाण करण्याची सत्ताधारी मंडळींची ही कृती लोकशाही व्यवस्थेची गळा घोटणारी असून, लातूरच्या सुसंस्कृत राजकारण व समाजकारणाला गालबोट लावणारी आहे, असे आमदार देशमुख यांनी म्हटले.

या कृतीच्या विरोधात आवाज उठवला जाईल आणि मारहाण करणाऱ्यांवर योग्य ती कायदेशीर कार्यवाही करावी, अशी मागणी लावून धरली जाईल, अशी ग्वाही आमदार अमित देशमुख यांनी यावेळी दिली.

# पोलीसांची मटका अड्ड्यावर धाड;चौघांना घेतले ताब्यात

## बसस्थानक परिसरात सुरू होता जुगार अड्डा



तभा वृत्तसेवा

माहूर ,दि. २४ जुलै : माहूर शहर बस स्थानकासमोर असलेल्या चहा टपरीवर काही इसम मटका घेत असल्याची माहिती मिळाल्याने पोलीस निरीक्षक गणेश कराड यांनी स्वतः मटका अड्ड्यावर जात धाड टाकून मटका घेण्याचे साहित्यासह रोख रक्कम असे एकूण ४ हजार ७६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून चौघांना ताब्यात घेतल्याची घटना आज दि. २४ रोजी २.४५ वाजता घडल्याने खळबळ उडाली आहे.

पोलिस निरीक्षक गणेश कराड हे शासकीय वाहनाने पेट्रोलिंग करीत असतांना गुप्त सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार सदरील ठिकाणी दोन पंचांना सोबत घेऊन धाड टाकली असता काही इसम बसस्थानक परिसरात टि सेंटर च्या बाजुला बेकायदेशिर व विनापरवाना आकड्यावर पैस लावुन लोकांकडून पैस घेवून मिलन डे नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असताना चौघेजण आढळून आल्याने त्यांना पकडून ठाण्यात आणले त्यांची अंगझडती घेतली असता त्यांच्या अंगझडतीत ४ हजार ७६० रोख रकमेसह मटका जुगाराचे साहित्य व नगदी मीलन नावाचा मटका जुगाराचे आकडे लिहीलेले ५ डायरी, त्यावर मराठीत आकडे लिहीलेले, दोन पेन असा मुद्देमाल त्यांच्या ताब्यात मिळुनआल्याने हे सर्व साहित्य आणि रक्कम जप्त करत माहुर शहरातील तीघांसह धनोडा तालुका महागाव जिल्हा यवतमाळ येथील एक अशा चौघांना पोलिस शिपाई पवन राऊत यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार कायदा प्रमाणे अटक करण्यात आली आहे. या कार्यवाहीत पोलीस निरीक्षक गणेश कराड, सपोनि पालसिंग ब्राह्मण सपोनि संदीप अन्येबोईनवाड, पोहेका गजानन चौधरी,पोहेका कैलास जाधव ,पोहेका पुष्पा पुसणाके, पवन राऊत आणि होमगार्ड सहभागी होते. पुढील तपास पोहेका गजानन चौधरी हे करीत आहेत.

# बिडकीन येथिल ब्लु व्हॅली इंग्लिश स्कुल मध्ये लोकमान्य टिळक यांची जयंती साजरी



बिडकीन दि २४ जुलै - पैठण तालुक्यातील बिडकीन येथिल सेठ मोतीलाल तोतला शैक्षणिक संस्था संचलित ब्लु व्हॅली इंग्लिश स्कुल मध्ये आज दिं. २३ जुलै रोजी लोकमान्य टिळक यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. शाळेच्या पर्यवेशिका वर्षा चव्हाण यांच्या हस्ते लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेचे पुजन व पुष्पहार घालुन अभिवादन करण्यात आले. शाळेचे शिक्षक ज्ञानेश्वर चव्हाण यांनी आपल्या भाषणाद्वारे विद्यार्थ्यांना लोकमान्य टिळक यांच्या बद्दल माहिती दिली. त्याचबरोबर शाळेतिल विद्यार्थ्यांनीही भाषणे केली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शाळेचा विद्यार्थी विराज खोंड याने केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतिल शिक्षक वर्षा चव्हाण, काजल देशमुख, सोनाली खोंड, दिपाली हनुवटे, दत्तात्रय चेडे, प्रकाश करोडीवल, ज्ञानेश्वर चव्हाण, कृष्णा भालेराव तसेच शाळेतिल विद्यार्थी, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले राष्ट्रगितेने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# श्री मोहटादेवी विद्यालयात लोकमान्य टिळक व चंद्रशेखर आझाद यांची जयंती साजरी



बिडकीन दि २४ पैठण तालुक्यातील म्हारोळा येथील श्री मोहटादेवी विद्यालयात आज दि २३ जुलै रोजी लोकमान्य टिळक व चंद्रशेखर आझाद यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली, याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक महेश धोरतळे सर प्रमुख पाहुणे जिल्हा परिषद केंद्र प्रमुख उमेश सोनवणे यांच्या हस्ते लोकमान्य टिळक व चंद्रशेखर आझाद यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले यावेळी सुभाष गवई, ज्योती गायकवाड, सतिश मुखेकर, प्रशांत शेळके,अंजुम पठाण, यांनी आपले विचार व्यक्त केले, सादर कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष धनंजय मूखेकर सचिव वंदना मुखेकर, यांनी शुभेच्छा संदेश देऊन गौरउदगार काढले, या कार्यक्रमासाठी बद्रीनाथ धरपळे, शंकर शिरसाठ, अनिता डोंगरे,अभय कापसे,परेश शिंदे, यांनी परिश्रम घेतले , कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिपक कार्डिले सर यांनी केले.

# पायाभूत सुविधा निर्माण करून राज्यातील आयटीआयचा चेहरामोहरा बदलणार : मंगलप्रभात लोढा

## 'जनसंवाद' कार्यक्रमात विभागातील अधिकारी - कर्मचाऱ्यांशी संवाद



अहिल्यानगर, दि. २४ - राज्य शासनाचे ५ हजार ४०० कोटी, जिल्हा नियोजनाचे ३६० कोटी व केंद्रशासनांकडून राज्यातील १०० आयटीआयचे होणारे बळकटीकरण, या माध्यमातून राज्यातील सर्व आयटीआयमध्ये पायाभूत सुविधांची निर्मिती होणार असून वर्षभरात आयटीआय संस्थांचा चेहरामोहरा बदलल्याचे चित्र दिसेल, असे प्रतिपादन कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाचे मंत्री ॲड. मंगलप्रभात लोढा यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित 'जनसंवाद' कार्यक्रमात मंत्री लोढा यांनी विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांशी थेट संवाद साधला. यावेळी आमदार विक्रम पाचपुते, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाचे नाशिक विभागीय सहसंचालक अनिल गावित, कौशल्य विकास समितीचे सदस्य विनायक देशमुख आदी उपस्थित होते.

मंत्री लोढा म्हणाले, राज्यातील आयटीआयमध्ये नवीन तंत्रज्ञानावर आधारित सहा नवीन अभ्यासक्रम सुरू केले जाणार आहेत. आयटीआयच्या शिक्षकांचा सन्मान वाढावा, यासाठी त्यांना कौशल्यवृद्धी प्रशिक्षण देण्याची योजना आखण्यात आली आहे. आयटीआय अभ्यासक्रमांना पदवीसमान दर्जा देण्याबाबत केंद्र शासनाकडे मागणी करण्यात आली असल्याचेही त्यांनी सांगितले. राज्यातील आयटीआयमध्ये दोन ते तीन महिन्यांचे अल्पकालवधीचे अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार असून, इच्छुक संस्था व आयटीआय यांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

सध्या राज्यात सुमारे ७०० जण तासिका तत्त्वावर कार्यरत आहेत. या कर्मचाऱ्यांची परीक्षा घेण्यात येईल व उत्तीर्ण झालेल्यांना नियमित सेवेत घेण्यात येईल. लॉर्ड मॅकालेच्या पारंपरिक शिक्षण पद्धतीऐवजी आता तांत्रिक व कौशल्याधारित शिक्षणाला प्राधान्य देण्याची वेळ आली आहे. महाराष्ट्रात देशातील सर्वाधिक स्टार्टअप आहेत. आतापर्यंत ३५ लाख तरुणांनी कौशल्य अभ्यासक्रम पूर्ण केले असून, त्यांची ऑनलाईन परीक्षा घेण्यात येणार आहे. त्यातून निवडलेल्या ५ लाख तरुणांना कर्ज व अनुदानाच्या सुविधा उपलब्ध करून देण्याची योजना प्रस्तावित आहे. शासन त्यांच्यासाठी मोफत सल्ला व मार्गदर्शन उपलब्ध करून देईल. निवड झालेल्या तरुणांच्या कर्जावरील ५० टक्के व्याज शासन भरणार असून, उत्कृष्ट २५ हजार तरुणांना स्टार्टअप सुरू करण्यासाठी विशेष उत्तेजन देण्याचा शासनाचा मानस असल्याचे श्री.लोढा यांनी सांगितले.

# रस्ते अपघात प्रकरणी अधिकाऱ्यांवर कारवाईसाठी कायदे बनवा : नितीन गडकरी यांच्याकडे मागणी

नगर : वाहतुकीला शिस्त लावण्यासाठी वाहनचालकांना दुप्पट दंड आकारण्याचा प्रस्ताव केंद्रीय सडक परिवहन मंत्रालयाने तयार केला असून तीव्र विरोध करणारे पत्र ई चलन विरोधी संघर्ष समितीचे अभय ललवाणी यांनी केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी यांना ई-मेलद्वारे पाठविले आहे. त्या निवेदनात ललवाणी यांनी म्हटले आहे की, वाहतुकीला शिस्त लावण्यासाठी केंद्रीय परिवहन मंत्रालयाने मोटार वाहन कायद्यातील तरतुदी व नियम अधिक कडक करण्यासाठी प्रस्ताव तयार केला आहे. त्या प्रस्तावानुसार नियम मोडणाऱ्या वाहन चालकांकडून दुप्पट तिप्पट दंडवसुली, वाहन चालविण्याचा परवाना रद्द करणे आदी प्रकारचे कडक नियम प्रस्तावित करण्यात आले आहेत. मात्र अशाप्रकारे दंड वसुलीस ललवाणी यांनी तीव्र विरोध नोंदवला आहे. रस्ते अपघात व जीवितहानीस केवळ वाहन चालकांना जबाबदार धरून त्यांचे कडून ई-चलन दंडवसुली कार्यपद्धतीने दंड वसूल करणे योग्य नाही. संबंधित अधिकाऱ्यांवर देखील आर्थिक दंड व फौजदारी स्वरूपाची कारवाई होणे आवश्यक आहे. त्यासाठी मोटार वाहन कायद्यात कठोर नियम तयार करावेत अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

# राहिला खुर्दचे शेतकरी चौथ्या दिवशीही उपोषणावर ठाम



तभा वृत्तसेवा

कन्नड : तालुक्यातील खारी खामगाव सिंचन प्रकल्पामुळे पुनर्वसित राहिला खुर्द (ता. कन्नड) येथील पांदन रस्ता क्र. २१०वरील दोन नाल्यांवर नळकांडी पुलाचे काम रखडल्याने ग्रामस्थ संतप्त झाले आहेत. शेतकरी अशोक राजाराम पवार यांच्या नेतृत्वाखाली रोहिला खुर्द ता.कन्नड येथे रविवार दि. २० पासून उपोषण सुरू आहे ते आज चौथ्या दिवशीही सुरु आहे. पावसाळ्यात प्रकल्प भरल्या नंतर नळकांडी फुल अभावी रस्ता बंद होतो त्यामुळे ५०० ते ६०० शेतकरी शेतवस्तीत अडकतात तसेच गावातील शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी मोठी अडचण निर्माण होते तसेच लहान मुलांना शाळेत नेणे, आजारी व्यक्तींना दवाखान्यात घेऊन जाणे, खते-औषधे वाहून नेणे यासाठी चिखलातून हालअपेष्टा सहन कराव्या लागतात. पुलाअभावी उसाचे पीक घेणेही शक्य होत नाही. या प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी ग्रामस्थांनी ४ एप्रिल रोजी लघुपाटबंधारे विभाग क्र. १, छत्रपती संभाजीनगर येथे निवेदन दिले होते. मात्र आजपर्यंत काहीच हालचाल झाली नसल्याने ग्रामस्थ आक्रमक झाले असून, दोन नाल्यांवर तातडीने नळकांडी पुलाची मागणी येथील ग्रामस्थ शेतकरी करत आहे.

# सोयगावात फडणवीस यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने रक्तदान शिबीर संपन्न



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२४ जुलै

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने भारतीय जनता पार्टीच्या वतीने सोयगाव,सावळदबारा येथे रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते.या शिबिरात एकूण ६० जणांनी रक्तदान केले. तसेच आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील वारसांना युरिया खताचे वाटप अल्पसंख्याक प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी,भाजपा नेते सुरेश बनकर पाटील यांच्या हस्ते वाटप करण्यात आले.यावेळी भाजपाचे सुनील मिरकर,जयप्रकाश चव्हाण,सोयगाव भाजपा तालुका अध्यक्ष संजय पाटील,डॉ. सरदार बर्डे, माजी नगराध्यक्ष कैलास काळे,माजी सरपंच वसंत बनकर,बद्री राठोड,माजी उपनगराध्यक्ष तथा सोयगाव तालुका उपाध्यक्ष योगेश पाटील,राहुल राठोड,शांताराम खराटे,संजीवन सोनवणे,अण्णा तांगडे,सूरज कवाल,राजू रेकनोद,संजय तायडे,सुनिल ठोंबरे,अनिस तडवी,सिताराम पाटील,संजय आगे,योगेश मानकर, मंगेश सोहनी,मयूर मनगटे,ईश्वर शिरसागार,अमृत राठोड,सुनील पाटील,संजय चौधरी,राजेंद्र मस्के,आदींसह संजीवनी रक्तपेढी चे कर्मचारी उपस्थित होते.

जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ.विनयकुमार राठोड हे सोयगाव शहरातील पोलीस ठाणे येथे भेट देण्यासाठी आले असता. त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित रक्तदान शिबिरास भेट दिली.यावेळी त्यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी भाजपाचे नेते,कार्यकर्ते उपस्थित होते.

# महाराष्ट्र सरकारने 'धोकादायक कारवाया प्रतिबंधक कायद्यात' सुधारणा केली

मुंबई. महाराष्ट्र सरकारने 'धोकादायक कारवाया प्रतिबंधक (सुधारणा) कायदा, २०१८' मध्ये मोठा बदल केला आहे आणि त्याची व्याप्ती वाढवली आहे. आता त्यात बेकायदेशीर जुगार, बेकायदेशीर लॉटरी आणि मानवी तस्करीमध्ये सहभागी असलेल्या लोकांचाही समावेश आहे. या दुरुस्तीनुसार, जर या कारवाया सार्वजनिक सुव्यवस्थेवर परिणाम करतात, तर त्यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करता येते, ज्यामध्ये घरबसल्या नजरकैदेचाही समावेश आहे. आतापर्यंत झोपडपट्टी मालक, बेकायदेशीर दारू विक्रेते, ड्रग्ज गुन्हेगार, वाळू तस्कर आणि काळाबाजार करणारे या कायद्यात समाविष्ट होते.

# बेकायदेशीर लॉटरी जुगार अथवा तत्सम जुगारामध्ये सहभागी होणे टाळावे

मुंबई : बेकायदेशीर जुगार, बेकायदेशीर लॉटरी अथवा तत्सम प्रकारच्या जुगारामध्ये सहभागी होण्याचे टाळावे असे आवाहन करण्यात आले आहे.

महाराष्ट्र झोपडपट्टी गुंड, हातभट्टीवाले, औषधिद्रव्यविषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती, दृकश्राव्य कलाकृतींचे विनापरवाना प्रदर्शन करणाऱ्या व्यक्ती (व्हिडीओ पायरेट्स), वाळू तस्कर आणि अत्यावश्यक वस्तुंचा काळाबाजार करणाऱ्या व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत (सुधारणा) अधिनियम, १९८१ (MPDA Act) यामध्ये महत्वाची सुधारणा करून सदर कायद्याची व्याप्ती वाढविण्यात आली आहे.

उक्त कायद्यामध्ये बेकायदेशीर जुगार, बेकायदेशीर लॉटरी आणि मानवी अपव्यापार करणाऱ्या व्यक्ती यांचा समावेश करण्यात आला आहे. सदर सुधारणेमुळे बेकयदेशीर जुगार किंवा बेकायदेशीर लॉटरी चालवित असेल किंवा ती चालविण्याची व्यवस्था करीत असेल किंवा बेकायदेशीर लॉटरीची तीकीटे विकत असेल किंवा अशा कामाशी संबधीत असेल किंवा लॉटरी बाबतच्या कायद्यान्वये शिक्षेस पात्र अपराध करीत असेल अशा व्यक्तींचा समावेश करण्यात आला आहे.

त्यामुळे, बेकायदेशीर जुगार, बेकायदेशीर लॉटरी बाबतचे गुन्हे करणाऱ्या व्यक्तींच्या विघातक कृत्यांमुळे सार्वजनिक सुरक्षीततसे बाधा निर्माण होत असेल किवा होण्याची शक्यता असेल अशा गुन्हेगांराविरुध्द नमुद एम.पी.डी.ए. अधिनियमान्वये स्थानबद्धतेसारखी कठोर प्रतिबंधक कारवाई करण्याचे अधिकार पोलीसांना प्राप्त झाले आहेत.

# महाराष्ट्राच्या भूमीत दुर्मिळ जैन दृश्यकलेचा शोध: छत्रपती संभाजीनगर येथे दोन दिवसीय राष्ट्रीय परिषद! आयोजन

छत्रपती संभाजीनगर: इतिहास विभाग, शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर आणि श्री म. ब्र. आश्रम द्वारा संचालित गुरुदेव समंतभद्र सेंटर फॉर जैनिझम, कारंजा (लाड) यांच्या संयुक्त विद्यमाने 'जैन दृश्य वारसा: चित्रे, पुरातत्त्व व मूर्तिशास्त्र' या अत्यंत महत्त्वाच्या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. ही परिषद २६ व २७ जुलै २०२५ रोजी शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालयाच्या सुसज्ज हार्मनी हॉलमध्ये संपन्न होईल.

या परिषदेचा मुख्य उद्देश केवळ महाविद्यालयीन विद्यार्थी आणि अभ्यासकच नव्हे, तर सामान्य नागरिकांनाही जैन दृश्य कलेच्या अभ्यासाची अद्ययावत आणि सखोल माहिती उपलब्ध करून देणे हा आहे. भारतीय तत्त्वज्ञान, साहित्य, कला, स्थापत्यशास्त्र, विज्ञान आणि तंत्रज्ञान यांसारख्या अनेक क्षेत्रांमध्ये जैन धर्माने दिलेले महत्त्वपूर्ण आणि अतुलनीय योगदान या परिषदेद्वारे अधोरेखित केले जाईल.

परिषदेचे उद्घाटन सत्र (शनिवार, २६ जुलै २०२५):

सकाळी ९:३० ते ११:०० या वेळेत परिषदेचे शानदार उद्घाटन सत्र पार पडेल. या परिषदेचे उद्घाटक म्हणून माननीय श्री. जितेंद्र पापळकर (भा.प्र.से.), विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर हे उपस्थित राहतील. मुंबई उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायमूर्ती श्री. कैलाश चांदीवाल हे प्रमुख अतिथी म्हणून आपली गौरवशाली उपस्थिती दर्शवतील. श्री म. ब्र. आश्रम गुरुकुल, कारंजा (लाड) चे अध्यक्ष श्री. सतीश संगई हे स्वागताध्यक्ष असतील, तर शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. नवल सुबोध थोरात हे अध्यक्षस्थान भूषवून या महत्त्वपूर्ण सोहळ्याला मार्गदर्शन करतील.

# आईकू ने आईकू ज़ेड१0आर लाँच केला

नवी दिल्ली: उच्च-कार्यक्षमता स्मार्टफोन ब्रँड आईकू ने आज त्यांचा नवीन स्मार्टफोन आईकू ज़ेड१०आर लाँच केला. हा फोन विशेषतः नवीन युगातील कंटेंट निर्मात्यांसाठी डिझाइन केला आहे जे त्यांचे विचार उत्तम दर्जात टिपू इच्छितात आणि जगापर्यंत पोहोचू इच्छितात. कॅमेरा, कामगिरी आणि डिझाइन - हा फोन प्रत्येक बाबतीत पूर्णपणे सुसज्ज आहे.आईकू ज़ेड१०आर मध्ये सेगमेंटमधील सर्वोत्तम ३२एमपी ४के फ्रंट कॅमेरा आहे जो शार्प आणि उच्च-गुणवत्तेचे सेल्फी, व्लॉग आणि रील्स तयार करण्यासाठी परिपूर्ण आहे. यात एआय इरेज, एआय फोटो एन्हांस, मल्टी-फोकस पोर्ट्रेट आणि अंडरवॉटर मोड सारख्या स्मार्ट कॅमेरा वैशिष्ट्यांसह देखील येते, ज्यामुळे कधीही, कुठेही उत्तम कंटेंट तयार करणे सोपे होते.हा फोन मजबूतपणाच्या बाबतीतही मजबूत आहे - त्याला आयपी६८ आणि आयपी६९ रेटिंग आहे, म्हणजेच तो पाणी आणि धूळ प्रतिरोधक आहे. तसेच, यात भारतातील सर्वात पातळ क्वाड-कर्व्हडअमोलेड डिस्प्ले आहे, जो १२०हर्ट्झ रिफ्रेश रेट आणि १८०० निट्स पीक ब्राइटनेससह एक इमर्सिव्ह व्हिज्युअल अनुभव देतो.

# २६ वा कारगिल विजय दिवसानिमित्त विशेष कार्यक्रम

छत्रपती संभाजीनगर - २६ जुलै हा दिवस दरवर्षी कारगिल विजय दिवस म्हणून साजरा करण्यात येतो त्याचे औचित्य साधुन कारगिल स्मृतीवन, गारखेडा परिसर, छत्रपती संभाजीनगर येथे दि. २६ जुलै २०२५ रोजी २६ वा कारगिल विजय दिवस समारोह सळाळी ७.०० वाजता सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत साजरा करण्यात येणार आहे. सदर कार्यक्रमामध्ये सैन्यातील जुना आर्मी टँक हा सर्व नागरिकांसाठी लोकार्पित करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील सर्व माजी सैनिकांनी या कार्यक्रमास हजर राहुन कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांनी प्रसिद्धी प्रत्रकाद्वारे अवाहन केले आहे.

# आर्य चाणक्य शाळेचे नेतृत्व गुण विकास शिबीर संपन्न

पैठण (प्रतिनिधी ):-आर्य चाणक्य प्राथमिक विद्यामंदिर पैठण येथील विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने बालाजी मंदिर वडवाळी येथे नेतृत्व गुण विकास शिबीर संपन्न झाले.

विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक विकास व सोबत नेतृत्व गुणविकास होण्याच्या दृष्टीने विविध क्षेत्रात अग्रेसर असलेल्या मान्यवरांची मार्गदर्शन तीन सत्र ठेवण्यात आले होते.

उदघाटन व उद्बोधन सत्रामध्ये वडवाळी ग्रामपंचायत सरपंच,कार्यक्रमाचे अध्यक्ष सौ. स्वाती किशोर काळे, प्रमुख अतिथी सुरेश वायभट मार्गदर्शक आयुब शेख,मुख्याध्यापक भास्कर कुलकर्णी यांच्या शुभहस्ते सरस्वती माता व भारत माता यांच्या प्रतिमेचे पूजन,दीप प्रज्वलन व श्रीफळ वाढवून करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक उज्वला कुटे यांनी केले.

कार्यक्रमाचे मार्गदर्शक आयुब शेख यांनी विनोदी शैलीमध्ये व कवितांच्या माध्यमातून मुलांना मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या मार्गदर्शनामध्ये मुलांना वाचनाचे महत्त्व सांगितले पुस्तक वाचल्याने आपले विचार प्रगल्भ होतात आणि ते मस्तक कधी कोणासमोर नतमस्तक होत नाही. -डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार मुलांच्या गळी उतरवण्यासाठी प्रयत्न केला. केल्याने होत आहे रे अधि केलेचे पाहिजे हा विचार आत्मसात करून ध्येय समोर ठेवा. गुरुजनांचा मोठ्यांचा आदर आपण राखला पाहिजे. वाचनासोबत लेखनाची देखील सवय अंगी करा छोट्या छोट्या कविता चारोळ्या लिहिण्याचा प्रयत्न करा. असे सांगितले.तर प्रमुख अतिथी सुरेश वायभट यांनी पत्रकारिता क्षेत्रातील नेतृत्व करताना येणारे अनुभव सांगितले. पत्रकाराने केलेले भाष्य १००% प्रमाण मानले जाते म्हणून पत्रकार हा स्वच्छ, सत्य व समाजाचा आरसा असावा.त्याने समाजाचे प्रगट्यीकरण निपक्षपाती पणे करावे असे प्रतिपादन केले.



अध्यक्षीय समारोपात सरपंच सौ. काळे ताई यांनी महापुरुषाचे फक्त फोटो लावू नये तर त्यांचे जीवन चरित्र आपण अभ्यासावे व स्वतः ते काही अंशी तरी स्वीकारावे अशी अपेक्षा व्यक्त करत वडवाळीच्या प्रथम नागरिक म्हणून गावात शाळेचे स्वागत व उपक्रमाचे कौतुक केले.

दुसऱ्या सत्रात विविध कलागुणांचे दर्शन हा कार्यक्रम समृद्धी डिघुळे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिशय नियोजन पूर्वक तयारी करून संपन्न झाला. त्यातून विद्यार्थिनींनी मोबाईलचे दुष्परिणाम ही नाटिका, देशभक्तीपर गीतावर नृत्य सादर करत सर्वांची मने जिंकली. या सत्रात शिवराज धनसुरे यांनी अभंग गायन तर विलास खर्डेकर यांनी भावगीतांचे सुमधुर गायन केले. मनोज शिंगारे यांनी विविध कला गुण दर्शनाचे दर्शन घडवले. या सत्रात भिल्ल समाज संघटनेचे राज्य अध्यक्ष व ग्रामपंचायत तंटामुक्ती मुक्ती अध्यक्ष अशोक बर्डे यांनी देखील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शाळेच्या या स्तुत्य उपक्रमाबद्दल विशेष कौतुक केले आगामी कालावधीत इतर शाळेनी असे उपक्रम राबवल्यास नक्कीच मुलांचे नेतृत्व तयार होण्यास मदत होईल असे सांगितले.

समारोपाच्या तिसऱ्या सत्राचे प्रमुख अतिथी डॉ. सुनील गायकवाड, प्रमुख मार्गदर्शक शिवाजी गाडे, अध्यक्ष व मुख्याध्यापक भास्कर कुलकर्णी व संचालक नंदकिशोर मालानी आदी मान्यवर उपस्थित होते.

या सत्रात प्रमुख अतिथी डॉ. गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना सुखी व समाधानी आयुष्यासाठी सुदृढ शरीराची उपासना करणे किती महत्त्वाचे आहे हे विशद केले. आजच्या सवयी उद्याचे नेतृत्व तयार करणार आहे.मोबाईलच्या व्यसनांची गंभीर परिणाम भविष्यात दिसतील तेव्हा आजच सावध व्हा.बेकरी प्रॉडक्ट १००% टाळण्याचा सल्लाही दिला असे सांगितले . शिवाजी गाडे यांनी मी इथे दिव्यांगाचे नेतृत्व करतो म्हणून निमंत्रित आहे हे स्पष्ट केले. १६७ किल्ल्यांची इतं:भूत माहिती असणारे गाडे यांनी शिवरायांच्या स्वराज्याचे साक्षीदार असणारे गड किल्ले अनेक दिव्यांगाना सोबत घेऊन सर केले, हे किल्ले नक्कीच नेतृत्व, ताकद आणि प्रेरणा देणारे आहेत.हा अनुभव सांगताना ते म्हणाले यातील एकाही दिव्यांगाला साधे खर्चटले सुद्धा नाही, यामध्ये आठ अंध व्यक्तींचाही समावेश होता. अशा थरारक अनुभवाची मांडणी त्यांनी विद्यार्थ्यांसमोर केली. अध्यक्षीय समारोपात भास्कर कुलकर्णी यांनी शाळेतील विशेष उल्लेखनीय उपक्रमांची माहिती देत, दुर्ग भ्रमंतीचे अनुभव सांगितले. विद्यार्थ्यांना नेतृत्व गुण कसे विकसित करावे याचे मार्गदर्शन केले.हे शिबिर यशस्वी होण्यासाठी मुख्याध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली अभ्यासपूरक मंडळाच्या प्रमुख उज्वला कुटे,शिबीर प्रमुख बाळू लाड व सर्व सहकारी शिक्षक यांनी विशेष परिश्रम घेतली. व शिबिर यशस्वीतेसाठी वडवाळी ग्रामस्थांनी सहकार्य केले.

या नेतृत्व गुण विकास शिबीराचे सर्व सत्राचे सूत्रसंचालन आरोही जाधव ,साक्षी बडे ,मयुरी रंधे ,आदिश्री जैवळ, श्रुती सावंत ,तेजश्री खेडकर ,देवदत्त वैद्य, साईराज पवार, शंकर काळे या विद्यार्थ्यांनी केले तर प्रियंका निकाळजे यांनी सर्वांचे आभार मानले.

## टी. सी. हरवली

माझी हिमायतनगर हदगाव प्रवासात पांडुरंग चांदराव वानखेडे या नावाने इयत्ता ७वी पासची टि.सी. हारवली आहे. कोणास भेटल्यास संपर्क साधणे.

संपर्क
पांडुरंग चांदराव वानखेडे
मु.पो. पळसपुर ता. हिमायतनगर
मो.+९१९८८१४३१९१८

यूनियन बैंक Union Bank of India

क्षेत्रीय कार्यालय - अहिल्यानगर
प्लॉट नं. ३, ४, ८ व ९, बोल्हेगाव पुलाजवळ, नगर मनमाड रोड, नागापूर, अहिल्यानगर - ४१४१११

**भाडेतत्वावर जागा पाहीजे**

युनियन बँक ऑफ इंडियाला -
१) जालना, ता. जि. जालना मुख्य शाखेकरिता - १७०० स्क्वे फुट (+ - १०%)
२) छत्रपती संभाजीनगर, ता. जि. छत्रपती संभाजीनगर मुख्य शाखेकरिता प्रामुख्याने तळमजल्यावर पैठण गेट परिसरात १७०० स्क्वे फुट (+ - १०%) सर्व सुविधा असलेली कमर्शिअल जागा भाडेतत्वावर हवी आहे. याबाबतची अधिक माहिती बँकेची वेबसाईट www.unionbankofindia.co.in / गव्हर्नमेंट्स ई प्रोक्युअरमेंट पोर्टल www.eprocure.gov.in वर उपलब्ध आहे.

इच्छुकांनी विहीत नमुन्यातील निवीदा या दि. १४/०८/२०२५ दुपारी ४.०० वाजेपर्यंत वरील पत्त्यावर सादर कराव्यात. या प्रकल्पाबाबत काही सुधारणा / बदल असल्यास ते बँकेच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात येतील. त्याबाबत वर्तमानपत्रांतुन जाहिरात प्रसिद्ध केली जाणार नाही. प्राप्त निवीदा कोणतेही कारण न देता स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार बँकेने राखुन ठेवला आहे.

क्षेत्रीय प्रमुख
क्षेत्रीय कार्यालय,अहिल्यानगर

दि. २४/०७/२०२५ अहिल्यानगर

ARL

## अग्रलेख...

# शहरी माओवादाचा खरा चेहरा

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी (दि. २२ जुलै) झालेल्या कार्यक्रमात गडचिरोलीला विकासापासून दूर ठेवण्यासाठी शहरी माओवाद्यांना विदेशातून निधी मिळत असल्याचा गौप्यस्फोट केला. शहरी नक्षलवाद नावाचा कोणताही प्रकार अस्तित्वात नाही, अशी आवई काही संघटना, राजकीय पक्ष आणि इतर काही जणांकडून उठवली जाते आणि मुख्यमंत्री अशी गंभीर माहिती देतात. त्यामुळे या मुद्याकडे डोळसपणे पाहणे गरजेचे आहे. या पृष्ठभूमीवर एक वास्तव समजून घेतले पाहिजे आणि ते असे की, शहरी नक्षलवाद अस्तित्वात आहे आणि त्यात सहभागी असलेले लोकच या गौप्यस्फोटाच्या निमित्ताने वेगळेच काही तरी 'नॅरेटिव्ह' समोर आणू शकतात. वंचितांच्या लढ्याची पृष्ठभूमी असलेली एकेकाळची चळवळ म्हणजे नक्षलवाद. त्याच शब्दाच्या आड माओवाद्यांनी देशात अनेक ठिकाणी कल्पनेच्या पलीकडे हातपाय पसरले असल्याचे सत्य कुणीही नाकारू शकत नाही. भारतात चीनविरुद्धची भावना अतिशय टोकदार आहे. त्यामुळे माओ त्से तुंग किंवा माओवाद भारतात स्वीकारला जाणार नाही, याची पूर्ण कल्पना नक्षलवादाच्या नावाखाली काम करणाऱ्या माओवाद्यांना होती. या गोष्टीचा विचार करून त्यांनी 'नक्षलवाद' या शब्दाच्या आड माओवादाचेच जाळे देशात विणले. चारू मुजूमदार यांनीही माओवादी विचारसरणीची तळी उचलली होती. नक्षलवादी हे माओवादीच आहेत आणि ते देशाच्या आर्थिक, सामाजिक आणि संस्कृतीला मोठा धोका ठरत आहेत. मुळात माओवाद किंवा साम्यवाद ही विचारसरणी भारतातील नाही. त्यामुळे आपल्या देशातील संस्कृती, परंपरा, मूल्ये तसेच समाज रचना आणि सामाजिक मानसिकतेसोबत माओवादाची सांगड कोणत्याही पद्धतीने घालणे शक्य नाही. 'वसुधैव कुटुम्बकम्' किंवा 'सर्वे भवन्तु सुखिनः' हा विचार माओवादी विचारसरणी मानणाऱ्यांच्या आकलनापलीकडचा आहे. माओवाद्यांनी आज जे बुरखे घातले आहेत, त्याच्याआड असलेला त्यांचा खरा चेहरा अतिशय भेसूर आहे. भारतातील अतिशय श्रीमंत, समृद्ध सामाजिक संस्कृती व लोकजीवनातील सौहार्दाच्या परंपरा त्यांना उद्ध्वस्त करायच्या आहेत. त्यामागेही त्यांचा अतिशय कपटी विचार आहे.

भारतातील परंपरा समाजातून नष्ट करायच्या, सांस्कृतिक खाणाखुणा मिटवायच्या तसेच समाजाला त्यापासून दूर न्यायचे आणि त्यांची श्रद्धास्थाने उद्ध्वस्त करायची असा त्यांचा डाव आहे. खुल्या विचारांच्या नावाखाली एकदा का श्रद्धास्थाने उद्ध्वस्त झाली की भारतीयांच्या डोक्यावर डाव्या विचारांच्या गुलामगिरीचे जोखड टप्प्याटप्प्याने टाकता येईल, असे त्यांना वाटते. तसेही ज्यांच्या आस्थाच भारताबाहेर आहेत, ते देशाबद्दल, येथील नागरिक आणि त्यांच्या संस्कृतीबद्दल सकारात्मक विचार कसा करू शकतील, हा एक मोठा प्रश्न या निमित्ताने उद्भवतोच. सामाजिक परंपरा उद्ध्वस्त कशा केल्या जातात, याचे उदाहरण गडचिरोलीतच आहे. माओवाद्यांनी येथील गोटूल ही आदिवासी परंपरा बंद पाडली. त्यामुळे वनवासींचे अतोनात नुकसान झाले आहे. ही परंपरा आदिवासींच्या उदार लोकरीतीचा भाग होती. माओवाद्यांकडून कथित प्रगतिशील तत्त्वज्ञानाच्या आधारे लोकांमध्ये, समूहांमध्ये विषमतेच्या आणि शोषणाच्या विरोधात आपली बाजू प्रकर्षाने मांडण्याचा प्रयत्न केला जातो. मग, सामान्य विवेकाचे भान न ठेवता आचरण केले जाईल, असे वातावरण निर्माण केले जाते. हाच मानसिक खेळ माओवाद्यांकडून मोठ्या प्रमाणात खेळला जात आहे. त्यामुळे मूलभूत प्रश्न सोडवणे कठीण होऊन जाते. नेमके तेच या शहरी माओवाद्यांना आणि जंगलात असलेल्या त्यांच्या हस्तकांना देखील हवे असते. भारतासारख्या बहुढंगी, बहुरंगी देशात समस्याही बहुपदरी असतात. अनेक शतकांपासून विवंचनेच्या खाईमध्ये लोटल्या गेलेल्या समाजात आत्मविश्वास निर्माण करण्याची जबाबदारी राज्यकर्त्यांवर असते. दुर्दैवाने मागील काही काळात ही जबाबदारी योग्यरीत्या पार पाडली गेली नाही. त्याचा फायदा घेऊन माओवाद्यांनी जंगल आणि शहरांमध्ये हातपाय पसरले. खरे तर राज्यकर्त्यांनी या समस्यांकडे सत्ताकारणाच्या अंगाने पाहू नये. परंतु, घडत होते ते तसेच. खरा बदल झाला तो गेल्या दशकभरात. आता कुठे नक्षलवाद हा माओवाद आहे आणि शहरी नक्षलवाद अस्तित्वात आहे, असे जाहीरपणे म्हटले जाऊ लागले आहे. शहरी किंवा जंगली नक्षलवादाचे आव्हान भारताच्या सार्वभौमत्वाच्या दृष्टिकोनातून अतिशय गंभीर आहे. प्रजासत्ताकाच्या इतक्या दशकांच्या वाटचालीत अनेक राज्यांमध्ये वेगवेगळ्या प्रश्नांच्या माध्यमातून माओवाद्यांनी शहरी भागांमध्ये जातीय, धार्मिक, सामाजिक चळवळींच्या नावाखाली वेगवेगळ्या संघटना उभारल्या आहेत. वरकरणी त्यांचे खरे रूप लक्षात येत नाही. वंचित-शोषितांसाठी लढणाऱ्या संघटनेचा मुखवटा अशा अनेक संघटना वापरतात. कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (माओवादी) या प्रतिबंधित संघटनेचे 'स्ट्रॅटेजी ॲण्ट टॅक्टिस ऑफ इंडियन रिव्हॉल्युशन' हे पुस्तक अनेकदा चकमकींच्या नंतर पोलिसांनी जप्त केले. ते डिजिटल स्वरूपातही उपलब्ध आहे. माओवाद्यांच्या कार्यपद्धतीवर आधारित असलेल्या या पुस्तकाच्या भाग-२ व प्रकरण क्रमांक १३ मध्ये या माओवाद्यांची शहरी भागातील कार्याची दिशा स्पष्ट करण्यात आली आहे. यात माओवाद्यांनी काही अस्त्रांना जादुई असे संबोधले आहे. ती अस्त्रे म्हणजे संयुक्त मोर्चा आणि सैन्य. यातील संयुक्त मोर्चा हे सर्वाधिक प्रभावी आणि क्रांतिकारी अस्त्र असल्याचे माओवाद्यांना वाटते. याचा मूळ उद्देश देशातील प्रस्थापित संवैधानिक व्यवस्थांविरुद्ध लढण्यासाठी जनसमुदायाचा सहभाग वाढवण्याचा आहे. तो हेतू साध्य झाल्यानंतरच सशस्त्र क्रांतीचा मार्ग प्रशस्त होतो. यातील संयुक्त मोर्चा म्हणजेच शहरी माओवादी होत! प्रामुख्याने विद्यार्थी, युवा, परिपूर्ण विकास न झालेले लोक, महिला, वनवासी, भूमिहीन, गरीब शेतकरी आणि शोषित कामगारांदी वर्गांना मोहिनी घालून शहरी माओवादाच्या जाळ्यात खेचण्याचा प्रयत्न केला जातो. समाजातील घटकांमध्ये कोणत्या ना कोणत्या मुद्यावर विद्यमान सरकारच्या विरोधात राग असतोच. त्याचा वापर करून समाजात अशांतता निर्माण करणे, त्यांच्या डोक्यातील आगीची धग कायम ठेवण्यासाठी चिथावणी देत राहणे, त्यासाठी अपप्रचार करण्यासोबतच अफवा पसरवणे हे सारे धंदे केले जातात आणि वेळप्रसंगी त्यांचा वापर हिंसाचार भडकावण्यासाठीही केला जातो. गतवर्षी निवडणुकीच्या काळात शहरी माओवाद्यांच्या जवळपास २०० संघटना विशिष्ट हेतूने एका आंदोलनात सहभागी झाल्याचा गुप्तचर अहवाल होता. शहरी माओवादी विषय निवडून कृती समिती, संप समिती, संघर्ष समिती स्थापन करतात आणि आंदोलनाची आखणी करतात. आपल्या समस्या सशस्त्र क्रांतीशिवाय सुटूच शकत नाहीत, अशी चिथावणी दिली जाते. माओवाद्यांच्या या फ्रन्टल संघटनांची कार्यपद्धती अतिशय गुंतागुंतीची असते. अनेक श्रेणींमध्ये त्याची विभागणी करण्यात आली आहे. कोणत्या श्रेणीतील संघटना कोणते काम करेल, हे देखील निश्चित असते. प्रत्येक जण आपली जबाबदारी अत्यंत चोख पार पाडतो, असा सुरक्षा यंत्रणांचा आजवरचा अनुभव आहे.

कम्युनिस्टांची पावले कोणत्या दिशेला जाणार आहेत, हे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी फार पूर्वीच ओळखले होते. कम्युनिस्ट आणि सोशालिस्ट हे दोन गट संविधानाचा निषेध करीत आहेत. संविधान वाईट आहे, हे त्यांच्या निषेधाचे कारण नाही. कम्युनिस्टांना हुकूमशाही हवी आहे. आपले संविधान लोकशाहीवर अवलंबून आहे म्हणून कम्युनिस्ट त्याचा धिक्कार करीत आहेत, असे खुद्द डॉ. आंबेडकर यांनी २५ नोव्हेंबर १९४९ रोजीच्या भाषणात म्हटले होते. डॉ. आंबेडकर यांनी निर्माण केलेल्या मजबूत राज्यघटनेवर देश आज उभा आहे. तो प्रगतिपथावर आहे. माओवाद्यांना ही राज्यघटना नष्ट करून स्वातंत्र्याची गळचेपी करायची आहे. देशाच्या प्रगतीत बाधा आणायची आहे, हे लक्षात घेऊन शहरी माओवाद्यांवर अंकुश ठेवण्याची व त्यांना चिरडण्याची गरज आहे. त्यांना विदेशातून पैसा मिळत असल्याचा मुख्यमंत्र्यांनी केलेला गौप्यस्फोट हा एक गंभीर इशारा आहे प्रत्येक भारतीयासाठी!

---

## तंत्रवेध

**डॉ. दीपक शिकारपूर**

# एआय आणि साहित्य-प्रकाशन व्यवसाय

कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) हा सध्याचा परवलीचा शब्द आहे. आयटी क्षेत्रात अनेक लाटा येतात. उदा. क्वाऊड, वायटूके वगैरे. बदलत्या तंत्रज्ञानामुळे येत्या काळात अनेक क्षेत्रांमध्ये क्रांतिकारी परिवर्तन होणार आहे. आपल्या आसपासच्या डिजिटल विश्वाची सतत उत्क्रांती होत राहणार आहे. व्यक्तिगत तर आहेच, परंतु औद्योगिक, सामाजिक आणि सार्वजनिक पातळीवरही संगणकाच्या या विविध अवतारांचे अत्यंत क्रांतिकारी आणि दूरगामी परिणाम होतील. आधुनिक माहिती तंत्रज्ञानाने साहित्यनिर्मितीच्या क्षेत्रात क्रांती घडवून आणली आहे. संगणक, इंटरनेट आणि इतर तंत्रज्ञानाने लेखकांना नवीन संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. त्यामुळे या तंत्राला शत्रू न मानता मित्र मानायला हवे. यामुळे अनेक पर्याय उपलब्ध होतील. पूर्वी लेखक हस्तलिखित मजकूर वापरत. त्यात काही चुका आढळल्यास सर्व मजकूर पुन्हा लिहावा लागे. २००० नंतर डेस्क टॉप पब्लिशिंग (संगणकीय डेटा एंट्री)मुळे या प्रक्रियेत क्रांती झाली आणि सर्व घटकांना फायदा झाला (लेखक, प्रकाशक, टंकलेखक). आता यापुढील पायरी २०२७ नंतर येईल. चॅट बॉट्सशी संवाद साधून आपण मजकूर त्वरित संगणकीय फॉरमॅटमध्ये आपोआप तयार करू शकू. ना हाताने लिहिणे ना संगणकावर टाईप करणे. इंटरनेटमुळे लेखकांना आपल्या साहित्यनिर्मितीचा प्रचार आणि प्रसार करणे सोपे झाले आहे. ते आता आपली साहित्यनिर्मिती जगभरातील वाचकांपर्यंत पोहोचवू शकतात. इतर तंत्रज्ञानांनीही साहित्यनिर्मितीच्या क्षेत्रात मोठा बदल घडवून आणला आहे. उदाहरणार्थ, थ्रीडी प्रिंटिंग तंत्रज्ञानाचा वापर करून लेखक आता आपल्या साहित्यनिर्मितीची भौतिक प्रतिकृती तयार करू शकतात.

कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मशीन लर्निंग ही अलिकडच्या वर्षांमध्ये साहित्यनिर्मितीवर मोठ्या प्रमाणावर परिणाम करणारी दोन महत्त्वाची तंत्रज्ञाने आहेत. एआय आणि मशीन लर्निंग तंत्रज्ञानाचा वापर साहित्यनिर्मितीच्या विविध पैलूंमध्ये केला जात आहे, जसे की लेखन, भाषांतर, संपादन आणि प्रकाशन. एआय आणि मशीन लर्निंग तंत्रज्ञान साहित्यनिर्मितीच्या पारंपरिक पद्धतींना आव्हान देत आहे आणि साहित्यनिर्मितीच्या क्षेत्रात क्रांती घडवून आणत आहे. तंत्रज्ञानाचा वापर करून लेखन प्रक्रिया स्वयंचलित केली जाऊ शकते. एआय आणि मशीन लर्निंग तंत्रज्ञानाचा वापर करून, लेखकांना साहित्यनिर्मितीसाठी आवश्यक असलेली माहिती आणि संसाधने उपलब्ध करून दिली जाऊ शकतात. एआय आणि मशीन लर्निंग तंत्रज्ञानाचा वापर करून लेखकांना साहित्यनिर्मितीमध्ये अधिक सर्जनशील होण्यास मदत केली जाऊ शकते. काही लोकांचा विश्वास आहे की एआय आणि मशीन लर्निंग



तंत्रज्ञान साहित्यनिर्मितीच्या क्षेत्रात क्रांती घडवून आणणार आहे आणि साहित्यनिर्मितीच्या पारंपरिक पद्धतींना आव्हान देणार आहे. काही लोकांचा विश्वास आहे की एआय आणि मशीन लर्निंग तंत्रज्ञान साहित्यनिर्मितीच्या क्षेत्रावर नकारात्मक परिणाम करेल आणि साहित्यनिर्मितीच्या गुणवत्तेवर परिणाम करेल. एआय आणि मशीन लर्निंग तंत्रज्ञानाचा साहित्यनिर्मितीच्या क्षेत्रावर होणारा परिणाम हा एक चर्चेचा विषय आहे, परंतु हे निश्चित आहे की एआय आणि मशीन लर्निंग तंत्रज्ञान साहित्यनिर्मितीच्या क्षेत्रावर मोठा प्रभाव पाडणार आहे.

एआयमुळे होणारे सकारात्मक परिणाम लक्षात घेण्याजोगे आहेत. पहिला लक्षवेधी परिणाम म्हणजे लेखन प्रक्रिया सुलभ होणे. एआय आधारित लेखन सहायक ठरणारी एआय टूल्स लेखकांना कल्पना सुचवणे, कथा विस्तारणे आणि लेखनशैली सुधारण्यासाठी मदत करतात. हे टूल स्वयंचलित मसुदा लेखन, एआय संक्षेप, सुधारणा आणि पुनर्लेखन करू शकते. यामुळे लेखकांचा वेळ वाचतो. संपादन आणि भाषांतर अधिक जलद आणि अचूक होऊ शकते. एआय समर्थित संपादन साधने मजकुरातील व्याकरण, शैली आणि स्पष्टता सुधारतात. बहुभाषीय प्रकाशन एआय-आधारित भाषांतर तंत्रज्ञानामुळे पुस्तके आणि लेख वेगवेगळ्या भाषांमध्ये झटपट आणि कमी खर्चात अनुवादित करता येतात. परिणामी, प्रकाशन प्रक्रिया सोपी होते. शिवाय एआय आणि प्रिंट फॉरमॅटमध्ये सामग्री सहज रूपांतरित होते. एआय-आधारित कव्हर डिझाईन टूल्स पुस्तक कव्हर आकर्षक पद्धतीने डिझाईन करण्यासाठी मदत करतात. यामुळे स्वयंप्रकाशन सोपे होते तसेच अन्य प्लॅटफॉर्मवर एआयच्या मदतीने पुस्तक प्रकाशन अधिक जलद होते. एआय-आधारित शिफारशींची सोय वाढल्यामुळे विविध प्लॅटफॉर्मवर एआय वाचकांच्या पसंतीनुसार पुस्तके सुचवते. एआय माध्यम सोशल मीडिया प्रचार, सोशल मीडिया पोस्ट, जाहिराती आणि ईमेल मार्केटिंगसाठी उत्तम सामग्री तयार करू शकते. एआय ग्राहक सेवा आणि चॅटबॉट्स वाचकांसाठी वैयक्तिक सल्ला आणि मदत करणारे बॉट्स निर्माण करू शकते.

एआय लेखकांना सहायक म्हणून वापरणे जमायला हवे. संपूर्ण लेखन एआयकडे सोपवण्याऐवजी कल्पनांसाठी आणि सुधारण्यासाठी वापर करणे अधिक महत्त्वाचे ठरते. म्हणजेच एआय संपादन आणि प्रकाशन प्रक्रिया सुलभ करेल, पण लेखनाच्या तसेच प्रकाशनाच्या प्रत्येक टप्प्यामध्ये अंतिम निर्णय माणसानेच घ्यावा. एआय निर्मित साहित्यावर स्पष्ट टॅगिंग असावे. यापुढील काळात आपण कुठलेही तंत्रज्ञान थांबवू शकणार नाही. यामध्ये कटपेस्ट पेरणारे भोंदू नक्कीच बळी पडतील. विषय, साहित्यप्रकार आणि शैली सांगितली की चॅट जीपीटीची यंत्रणा आपोआप कविता करते.

पहिला मुद्दा म्हणजे या प्रक्रियेमध्ये मानवी भावनांचा अभाव असेल. एआयद्वारे तयार केलेले साहित्य मानवी भावना आणि अनुभव पूर्णपणे व्यक्त करू शकत नाही. मानवी अनुभव, भावना आणि सूक्ष्म विचार एआयच्या लेखनात सहसा दिसत नाहीत. यामुळे लेखनात मानवी स्पर्श आणि सहानुभूतीचा अभाव जाणवू शकतो. येथे नैतिक आणि कॉपीराईटचे प्रश्नही उपस्थित होतील. एआयने तयार केलेला मजकूर कोणाच्या मालकीचा आहे, यावरून कॉपीराईटचा प्रश्न उद्भवू शकतो. तसेच एआयने योग्य परवानग्या घेऊन उपलब्ध डाटा न वापरल्यास अनेक नैतिक समस्या निर्माण होतील. एआयच्या वापरामुळे प्रकाशन व्यवसायातील काही कर्मचाऱ्यांच्या नोकऱ्या जाऊ शकतात. कंटेंट रायटिंग, प्रूफरीडिंग आणि भाषांतर यासारख्या क्षेत्रांमधील काही नोकऱ्या एआयमुळे प्रभावित होऊ शकतात, कारण एआय बरीच कामे स्वतः पटकन करून देऊ शकतो. त्याचप्रमाणे एआयचा वापर करून चुकीची माहिती आणि अफवा पसरवल्या जाऊ शकतात. साहित्य व प्रकाशन व्यवसायावर एआयचा सकारात्मक आणि नकारात्मक अशा दोन्ही प्रकारे परिणाम होऊ शकतो. त्यामुळे एआयचा वापर कसा करायचा याबाबत विचार करणे आवश्यक आहे. एआय हे लेखनासाठी एक शक्तिशाली साधन आहे. ते लेखकांना अधिक कार्यक्षम बनवू शकते आणि त्यांची उत्पादकता वाढवू शकते. मात्र एआयवर पूर्णपणे अवलंबून न राहता एक सहायक म्हणून त्याचा वापर करणे महत्त्वाचे आहे. मानवी सर्जनशीलता, गंभीर विचार आणि नैतिक विचार एआयच्या मर्यादेपलीकडचे आहेत. लेखनामध्ये त्यांची भूमिका नेहमीच महत्त्वाची राहील. एआयचा योग्य आणि जबाबदार वापर केल्यास लेखनक्षेत्रात क्रांती घडून येईल, पण मानवी लेखकाचे महत्त्व कधीही कमी होणार नाही.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

---

## वेध

**नीलेश जोशी**

# गोवंश हत्या अन् चोराच्या उलट्या बोंबा

मानवाची दिवसेंदिवस कमी होत असलेली प्रतिकारशक्ती, बळावत असलेले नवनवीन आजार यासंदर्भात अभ्यास करणाऱ्या तज्ज्ञांनी विषमुक्त अन्नाची गरज वारंवार अधोरेखित केली आहे. याबाबत केवळ राज्यातच नव्हे तर जगभरात चिंतन सुरू आहे. अन्न घटकांसाठी प्रामुख्याने शेतीच्या उत्पादनावर अवलंबून असणाऱ्या मानवाला शेतीतून मिळणारे उत्पादन विषमुक्त कसे मिळेल, त्याकरिता काय उपाययोजना कराव्या लागतील याचा विचार देखील अग्रक्रमाने सुरू आहे. त्यात अभ्यास, चिंतनातून समोर आलेल्या निरीक्षणानुसार पारंपरिक सेंद्रिय शेतीच्या माध्यमातून मिळणारे उत्पादन हे अधिक सकस, आरोग्यदायी आणि विषमुक्त आहे. म्हणूनच मोठ्या प्रमाणावर पारंपरिक अर्थात सेंद्रिय शेतीचा प्रचार-प्रसार सर्वच स्तरावरून केला जातो आहे. पूर्वीपासूनच आपले 'कृषी आधारित ग्राम व्यवस्था आणि गोवंश आधारित कृषी व्यवस्था' हे वैशिष्ट्य आहे. मात्र दुर्दैवाने रासायनिक खते आणि कीटकनाशकाच्या अतिरेकी वापराने मानवी जीवनच दूषित झाले. त्यातही गोवंशाची सर्रास होणारी कत्तल गोवंश आधारित कृषी व्यवस्थेला मारक ठरली. म्हणूनच महाराष्ट्रात देवेंद्र फडणवीस सरकारने गोवंश हत्याबंदी कायदा निर्माण करून गोवंश हत्येवर कायद्याने बंदी आणली. तरी देखील गोवंशाची कत्तल होत असल्याचे दिसून येते. मात्र गत कालावधीत विश्व हिंदू परिषद, बजरंग दल यांच्यासह समाजातील सामाजिक संघटनांनी पोलिस प्रशासनाला मदत करण्याचे धोरण राबवून प्रशासनाच्या माध्यमातून गोवंशाची अवैध वाहतूक, गोवंश हत्या याला काही अंशी आळा घातला. त्यामुळेच अस्वस्थ होऊन गोवंश हत्या करणाऱ्यांनी समाजाची ढाल पुढे करून, साळसूद असल्याचा आव आणत राज्यभर आंदोलनाला सुरुवात केली आहे. पण मुळात त्यांना असे आंदोलन करण्याचा नैतिक अधिकार आहे का हा खरा प्रश्न आहे.



समाजहिताच्या व्यापक दृष्टिकोनातून देवेंद्र फडणवीस यांनी राज्यात गोवंश हत्याबंदी कायदा लागू केला. जेव्हापासून हा कायदा अस्तित्वात आला तेव्हापासूनच जिभेच्या चोचल्यांपुढे समाजहित गौण मानणाऱ्यांनी या कायद्याविरोधात रान उठवले. कायद्याच्या चौकटीत आपले म्हणणे सिद्ध करू न शकल्याने ही सर्व मंडळी हताश झाली आहे. न्यायालयात त्यांची कुठलीच बाजू तग धरू शकली नाही आणि म्हणूनच आता झुंडशाहीने दबाब आणण्याचा त्यांचा नेहमीचाच खेळ त्यांनी सुरू केला. गोवंशाशिवाय अन्य जनावर खरेदी, विक्री, वाहतूक आणि कत्तल करण्याआड गोवंश हत्या प्रतिबंधक कायदा येतो, या कायद्याआड मारहाण केली जात असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. त्यातूनच राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समितींमध्ये जनावरांची खरेदी-विक्री बंदचे आवाहन त्यांनी केले. या आंदोलनाला प्रतिसाद न दिल्यास १ ऑगस्टपासून लाक्षणिक आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा देखील कुरेशी समाजाच्या पदाधिकाऱ्यांनी दिला. खरं म्हणजे एकीकडे गोवंशाच्या कत्तलीसाठी निर्माण झालेली कायदेशीर अडसर आणि दुसरीकडे समाजात जनजागृती होऊन विविध संस्था, संघटनांचा विरोध ही खरी समस्या आंदोलनकर्त्यांची आहे. कारण गोवंशाची कत्तल आम्ही करीत नाही असे म्हणणारेच या आंदोलनात ठिकठिकाणी दिसून येतात. गोवंशाची कत्तल, अत्यंत निर्दयपणे गोवंशाला कोंबून केली जाणारी अवैध वाहतूक जर तथाकथित कसाई नाकारत असतील तर राज्यात होणाऱ्या शेकडो कारवाई नेमक्या कुणावर होत आहेत हा प्रश्नच आहे. जेव्हा मोठ्या प्रमाणावर निर्दयतेने कोंबून भरलेल्या गोवंशाचे कंटेनर पकडले जातात, गोवंशाच्या कातडीचे ढीग जेव्हा या आंदोलनकर्त्यांच्या भाऊबंदांकडे आढळतात, गोवंशाची हाडे आणि शिंगे शेकडोंच्या संख्येने जेव्हा पोलिस जप्त करतात आणि एवढेच नव्हे तर अकोल्याच्या तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांनी अवैध कत्तल होत असल्याच्या माहितीवरून जेव्हा विशिष्ट वस्तीत पहाटे पाहणी केली त्यावेळी त्यांच्यासमोर देखील गोवंशाचे चामडे, नुकतीच हत्या केलेला गोवंश आणि हत्येसाठी बांधलेला गोवंश आढळून आला. तेव्हा आम्ही गोवंशाची कत्तल करीत नाही असे म्हणणारे आंदोलनकर्ते त्या त्या वेळी कायदा मोडणाऱ्या व्यक्तींच्या विरोधात सामोरे आले की समर्थनार्थ. वरील सर्व प्रश्नांची उत्तरे या आंदोलनकर्त्यांनी आधी द्यावीत अन्यथा हे आंदोलन म्हणजे केवळ 'चोराच्या उलट्या बोंबा' असेच म्हणावे लागेल.

९४२२८६२४८४

---

## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# कोण होणार नवा उपराष्ट्रपती?

संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी जगदीप धनकड यांनी उपराष्ट्रपतिपदाचा राजीनामा देत राजकीय वर्तुळात खळबळ उडवून दिली. प्रकृती अस्वास्थ्याच्या कारणावरून राजीनामा देत असल्याचे त्यांनी आपल्या राजीनामापत्रात म्हटले आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यांचा राजीनामा स्वीकारला असून तशी अधिसूचनाही गृहमंत्रालयाने जारी केली आहे. उपराष्ट्रपती हे राज्यसभेचे पदसिद्ध अध्यक्ष असतात. त्यामुळे धनकड यांच्या राजीनाम्याने राज्यसभेचे अध्यक्षपदही रिक्त झाले आहे.

धनकड यांनी तडकाफडकी दिलेल्या राजीनाम्यामुळे काही प्रश्न निर्माण झाले, त्याची चर्चा येत्या काळात होणार आहे. पहिला आणि सर्वांत महत्त्वाचा प्रश्न म्हणजे धनकड यांनी उपराष्ट्रपतिपदाचा राजीनामा का दिला आणि दुसरा तेवढाच महत्त्वाचा प्रश्न म्हणजे आता देशाचा उपराष्ट्रपती म्हणून कोणाची निवड होणार आहे. यातील पहिल्या प्रश्नाचे म्हणजे राजीनामा का दिला, याचे उत्तर फक्त धनकडच देऊ शकतील. मात्र राजीनामा दिल्यानंतर त्यांनी जे मौन धरले, त्यामुळे देशाला या प्रश्नाचे उत्तर त्यांच्याकडून मिळण्याची शक्यता वाटत नाही. धनकड यांची प्रकृती ठीक नव्हती, हे गेल्या काही महिन्यातील घटनाक्रमावरून दिसून आले. संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या टप्प्यात धनकड यांना राजधानी दिल्लीतील अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेत (एम्स) दाखल करण्यात आले होते. तेथे त्यांच्यावर ॲन्जिओप्लास्टीही झाली होती. मध्यंतरी काही दिवसांपूर्वी दिल्लीतील एका कार्यक्रमात ते अस्वस्थही झाले होते. ११ ऑगस्ट २०२२ ला धनकड यांची देशाचे चौदावे उपराष्ट्रपती म्हणून निवड झाली होती. त्यामुळे उपराष्ट्रपती म्हणून त्यांचा तीन वर्षांचा कार्यकाळ यावर्षी १० ऑगस्टला पूर्ण होणार होता. दोन वर्षांचा कार्यकाळ शिल्लक असताना धनकड यांनी राजीनामा दिल्यामुळे त्याची चर्चा होणे स्वाभाविक आहे. विशेष म्हणजे राजीनामा देण्याच्या दहा-बारा दिवसांपूर्वी धनकड यांनी एका कार्यक्रमात बोलताना २०२७ मध्ये योग्यवेळी मी निवृत्तीचा निर्णय घेईल, असे म्हटले होते. त्यामुळे त्यांच्या तडकाफडकी राजीनाम्याच्या निर्णयाची चर्चा होणे स्वाभाविक आहे. राजधानी दिल्लीतील राजकीय वर्तुळाला त्यांच्या राजीनाम्याबाबत वेगवेगळी कारणे दिली जात आहेत. त्यांच्या राजीनाम्याचा संदर्भ दिल्ली उच्च न्यायालयातील न्या. यशवंत वर्मा यांच्याविरुद्धच्या महाभियोग प्रस्तावाशीही जोडला जात आहे.

उपराष्ट्रपती होण्याआधी जगदीप धनकड पश्चिम बंगालचे राज्यपाल होते. धनकड हे मूळ भाजपाचे नाहीत. जनता दलातून त्यांनी आपल्या राजकीय कारकीर्दीला प्रारंभ केला. माजी उपपंतप्रधान चौधरी देवीलाल यांचे समर्थक म्हणून धनकड यांची सुरुवातीची ओळख होती. १९८९ मध्ये राजस्थानच्या झुंझुन लोकसभा मतदारसंघातून जनता दलाचे उमेदवार म्हणून त्यांनी निवडणूक लढवली आणि जिंकली. विश्वनाथ प्रतापसिंह यांच्या मंत्रिमंडळात त्यांचा राज्यमंत्री म्हणून समावेश झाला. नंतर राजकीय घडामोडीत व्ही. पी. सिंग यांचे सरकार पडले आणि चंद्रशेखर देशाचे पंतप्रधान झाले. चंद्रशेखर यांच्या मंत्रिमंडळातही धनकड यांना बोलवण्यात आले. पण काही राजकीय कारणांनी त्यांनी शपथ घेण्यास नकार दिला. धनकड यांनी १९९३ मध्ये राजस्थान विधानसभेची निवडणूक जिंकत काँग्रेसमध्ये प्रवेश केला. मात्र नंतर काँग्रेसमध्ये अशोक गहलोत यांच्याशी त्यांचे जमले नाही. गहलोत यांनी धनकड यांना विधानसभेची उमेदवारी नाकारली. त्यामुळे त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. पण राकाँतही ते फार काळ स्थिरावले नाहीत. २००३ च्या राजस्थान विधानसभा निवडणुकीच्या वेळी धनकड यांनी भाजपात प्रवेश केला. त्यामुळे धनकड हे मूळ भाजपाचे नाहीत.

धनकड यांना राष्ट्रीय राजकारणात प्रवेश करायचा होता. पण वसुंधरा राजे यांनी त्यांना राज्यसभेत जाण्यापासून रोखले. मात्र धनकड यांनी भाजपातच राहण्याचा निर्णय घेतला. मोदी पंतप्रधान झाल्यानंतर अचानक २०१९ मध्ये धनकड यांची पश्चिम बंगालचे राज्यपाल म्हणून निवड झाली. नंतर मात्र त्यांनी मागे वळून पाहिले नाही. २०२२ मध्ये उपराष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीत भाजपाचे उमेदवार म्हणून त्यांनी काँग्रेसच्या मागरिट अल्वा यांचा पराभव केला.

उपराष्ट्रपतिपदाचा राजीनामा देणारे धनकड हे पहिले नाहीत. याआधी व्ही. व्ही. गिरी (१९६९), आर. व्यंकटरमण् (१९८७) आणि शंकरदयाल शर्मा (१९९२) यांनी उपराष्ट्रपतिपदाचा राजीनामा दिला होता. मात्र या तिघांनी कोणत्याही राजकीय कारणाने नाही तर राष्ट्रपतिपदाची निवडणूक लढवण्यासाठी उपराष्ट्रपतिपदाचा राजीनामा दिला होता. विशेष म्हणजे हे तिघेही राष्ट्रपतिपदी निवडून आले. कृष्णकांत पण उपराष्ट्रपती म्हणून आपला कार्यकाळ पूर्ण करू शकले नाहीत. २१ ऑगस्ट १९९७ ला कृष्णकांत उपराष्ट्रपती झाले, पण कार्यकाळ संपायला काही दिवस असतानाच २७ जुलै २००२ मध्ये त्यांचे आकस्मिक निधन झाले. ३ मे १९६९ ला राष्ट्रपती डॉ. झाकिर हुसेन यांचे निधन झाले. त्यामुळे राष्ट्रपतिपदाची निवडणूक लढवण्यासाठी व्ही. व्ही. गिरी यांनी उपराष्ट्रपतिपदाचा राजीनामा दिला, त्यामुळे देशात अभूतपूर्व घटनात्मक पेचप्रसंगाची स्थिती उद्भवली. देशात राष्ट्रपती नाही आणि उपराष्ट्रपतीही नाही, अशीही परिस्थिती निर्माण झाली. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश न्या. मोहम्मद हिदायतुल्लाह यांची कार्यवाहक राष्ट्रपती म्हणून नियुक्ती करण्यात आली. देशात राष्ट्रपतिपदानंतर उपराष्ट्रपती हे दुसऱ्या क्रमांकाचे घटनात्मक पद आहे. राष्ट्रपतीच्या अनुपस्थितीत उपराष्ट्रपती राष्ट्रपतिपदाच्या सर्व जबाबदाऱ्या सांभाळू शकतो. जगदीप धनकड यांच्या राजीनाम्यामुळे आता उपराष्ट्रपतिपदासाठी निवडणूक घ्यावी लागणार आहे. विशेष म्हणजे ही पोटनिवडणूक नाही तर नियमित निवडणूक राहणार आहे. निवडून येणारा नवा उपराष्ट्रपती दोन वर्षांसाठी नाही तर पाच वर्षांसाठी राहणार आहे. सामान्यपणे आपल्या देशात आधी राष्ट्रपतिपदाची आणि नंतर उपराष्ट्रपतिपदाची निवडणूक होत असते. पण यावेळी आधी उपराष्ट्रपतिपदाची आणि नंतर राष्ट्रपतिपदाची निवडणूक होणार आहे. लोकसभा आणि राज्यसभा मिळून सध्या ७८६ सदस्य आहेत. यापैकी ६ जागा रिक्त आहे, म्हणजे ७८० जणांना मतदानाचा अधिकार आहे. निवडणूक जिंकण्यासाठी ३९४ मतांची आवश्यकता आहे. त्यामुळे भाजपाजवळ आपल्या रालोआतील मित्रपक्षाच्या मदतीने ही निवडणूक जिंकण्याएवढे निर्विवाद बहुमत आहे, यात शंका नाही. उपराष्ट्रपतिपदासाठी संरक्षण मंत्री राजनाथसिंह, बिहारचे राज्यपाल आरिफ मोहम्मद खान यांच्यासह अनेकांच्या नावांची चर्चा आहे. यात कोण बाजी मारणार हे लवकरच स्पष्ट होणार आहे. भाजपाचा नवा राष्ट्रीय अध्यक्ष कोण होणार याची चर्चा गेल्या दिवसांपासून माध्यमांत रंगत असताना त्यात आता देशाचा नवा उपराष्ट्रपती कोण या चर्चेचीही भर पडणार आहे, हे मात्र निश्चित.

९८८१७१७८१७

---

### स्वच्छ सर्वेक्षणात नागपूरला भोपळा

स्वच्छ भारत मिशन द्वारा आयोजित 'कचरामुक्त शहर' या श्रेणीत नागपूरला शून्य गुण मिळाल्याचे कळताच धक्का बसला. यासाठी केवळ प्रशासकीय यंत्रणा दोषी नाही. कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावणे ही नागरिकांचीही जबाबदारी आहे. घरचा ओला आणि सुका कचरा वेगवेगळा जमा करून तो कचरा गाडीवाल्याला द्यायला हवा. रस्त्यावर, खुल्या भूखंडावर, नाल्यात किंवा नालीत कचरा फेकू नये. स्वच्छ सर्वेक्षण २०२४-२५ च्या शहरी श्रेणीत मध्य प्रदेशातील इंदूर शहराने लागोपाठ आठव्यांदा प्रथम क्रमांक मिळवला आहे. तेथील नागरिकांना प्रशासनाने समजावून, दाटून आणि दंडित करून स्वच्छतेचे वळण लावले. कचरा गाड्यांवरील ध्वनिक्षेपकांवर उद्घोषणा आणि हिंदी लोकजागृतीपर गाण्यांची व्यवस्था केली. नागरिकांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून त्यांना या कार्यात सहभागी करण्याचे कठीण काम प्रशासनाने पोलिस विभागाच्या सहकार्याने करून दाखवले. जे इंदूरकरांना जमले ते आम्हा नागपूरकरांना जमणार नाही का? प्रशासन आणि नागरिकांनी एकमेकांना सहकार्य करावयास हवे. स्वच्छ सर्वेक्षणात यावर्षी मिळालेल्या सत्ताविसाव्या क्रमांकाने खचून न जाता अधिक जोमाने प्रयत्न व्हायला हवेत. आपले घर स्वच्छ ठेवण्याबरोबरच आपले शहर आपल्याकडून अस्वच्छ होणार नाही याची दक्षता प्रत्येक व्यक्तीने घ्यावयास हवी.

**डॉ. मदन काकडे**/९३७३११२४८७

●● ●●

### सभागृहाची अवहेलना थांबवा

'विधानभवनाच्या लॉबीमध्ये हाणामारी' ही बातमी वाचून मन विषण्ण झाले. विधिमंडळाच्या ठिकाणी अशी घटना म्हणजे कायदा सुव्यवस्थेचा बोजवाराच उडालेला आहे. जिथे आमदारच सुरक्षित नसतील तिथे जनतेचे हाल होणारच. विधिमंडळाच्या सभागृहात जनतेच्या भल्यासाठी चर्चा करून तसेच नवीन योजना, कायदा निर्माण करण्यासाठी जनतेने लोकप्रतिनिधींना निवडून दिले आहे. अशा पवित्र वास्तूमध्ये दोन पक्षांच्या कार्यकर्त्यांची हाणामारी, शिवराळ भाषा, शिवीगाळ होत असेल तर महाराष्ट्राची वाटचाल कुठे चालली आहे, असा प्रश्न सर्वसामान्य जनतेत पडला आहे.

लोकप्रतिनिधींना यासाठीच निवडून दिले आहे काय? मुख्यमंत्र्यांनी आता आपल्या प्रेमळ आणि पोपटपंची करणाऱ्या सर्व आमदारांना योग्य ती समज द्यावी. सरकार टिकवण्यासाठी सभागृहात असला लांच्छनास्पद प्रकार घडविण्यासाठी जे जे पुढे होते त्या सगळ्यांवर कठोर कारवाई करावी. सभागृहाची शिस्त कोणीच पाळत नाही हे शोभनीय नाही. ज्या ठिकाणी चर्चा, विविध विषयावर मंथन, आरोप-प्रत्यारोप व्हावेत अशा ठिकाणी हाणामारी, शिवीगाळ हे योग्य नाही. ज्या ज्या पक्षाचे समर्थक आहेत त्यांच्या प्रमुखांना ही धडा शिकवा आणि सभागृहाची अवहेलना थांबवा.

**संतोष राऊत**/९९६०१०४३४५

●● ●●

## वाचक पत्रे

### जीवनात पुस्तकांचे महत्त्व

पुस्तकांचे जीवनात फार मोठे स्थान आहे. पुस्तके म्हणजे ज्ञानाचे भांडार. ती आपल्याला नवे विचार, नवीन जग आणि अनेक अनुभवांची दारे उघडून देतात. पुस्तकांच्या माध्यमातून आपल्याला वेगवेगळ्या विषयांचे ज्ञान मिळते. इतिहास, भूगोल, विज्ञान, साहित्य, तत्त्वज्ञान, गणित अशा अनेक क्षेत्रांतील माहिती पुस्तके आपल्याला उपलब्ध करून देतात. एक चांगले पुस्तक वाचल्याने माणसाचा विचार करण्याचा दृष्टिकोन बदलतो, मन अधिक संवेदनशील व प्रगल्भ होते. विद्यार्थ्यांच्या आयुष्यात पुस्तके अत्यंत आवश्यक असतात. कारण त्यांच्याच माध्यमातून ते शिक्षण घेतात आणि परीक्षेत यश मिळवतात. पुस्तके केवळ माहिती देत नाहीत, तर विचार करण्याची क्षमता विकसित करतात. चांगली पुस्तके आपल्याला योग्य आणि अयोग्य यामधील फरक समजावतात. आत्मविकासासाठी, प्रेरणा मिळवण्यासाठी आणि जीवनात सकारात्मक दृष्टिकोन ठेवण्यासाठी पुस्तके उपयुक्त ठरतात. याशिवाय, पुस्तके आपल्या भावनांना वाट मोकळी करून देतात. चांगली पुस्तके आपल्याला चांगले विचार, जीवनमूल्ये आणि आदर्श शिकवतात. त्यामुळे पुस्तके केवळ शिक्षणाचे साधन नसून, ती आयुष्यभरासाठी असणारे खरे, निःस्वार्थी मित्र आहेत. पुस्तके ही माणसाचे खरे मित्र मानले जातात. छापील पुस्तकांचा स्पर्श, त्यातील शब्दांचा गंध आणि त्यातून येणारा अनुभव हा वेगळाच असतो. शेवटी एवढेच म्हणता येईल की, पुस्तके वाचा, जीवन समृद्ध करा. पुस्तके म्हणजे आपल्या आयुष्यातील खरे मित्र आहेत. ती कधीच धोका देत नाहीत, नेहमी मार्गदर्शन करतात. त्यामुळे नियमित वाचनाची सवय लावून आपले जीवन समृद्ध करूया.

**श्रीकांत संभाजी मगर**/९६८९११७१६९

●● ●●

### बडनेरा-नाशिक रोड मेमू ट्रेन नियमित करा

०१२११/०१२१२ बडनेरा नाशिक रोड मेमू ट्रेन नियमित करावी. ही ट्रेन गेल्या दोन वर्षांपासून विशेष ट्रेन म्हणून धावत आहे. आता प्रतीक्षा यादीतील लोकांना एक्सप्रेस आणि सुपरफास्ट ट्रेनमध्ये चढण्याची परवानगी नाही. त्यामुळे प्रवाशांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. जर बडनेरा नाशिक रोड मेमू नियमित केली तर प्रवाशांसाठी ते खूप सोयीचे होईल. ही ट्रेन इगतपुरीपर्यंत वाढवावी, ही अपेक्षा.

**राजेश पी. कारिया**/अकोला

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# कंत्राटदारांची प्रलंबीत देयके तत्काळ अदा करावेत, कंत्राटदारांची मागणी

## मयत हर्षल पाटील यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदतीची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ जुलै**

मागील एक वर्षापासून वेगवेगळ्या सर्व विभागातील अनेक योजनांची कामे करूनही अद्याप कंत्राटदारांची देयके प्रलंबीत आहेत. जिल्ह्यात सातशे ते आठशे कोटी रूपये किंमतीची प्रलंबीत देयके आहेत. कंत्राटदारांनी बँक व खाजगी सावकाराकडून कर्ज घेतल्यामुळे ते दबावात आ-हेत.वारंवार मागणी करूनही शासन, प्रशासन कंत्राटदारांची देयके काढीत नसल्यामुळे कंत्राटदारांसह त्यांच्यासोबत काम करणाऱ्या कामगारांवर उपासमारीची वेळ आली आहे. नुकतीच हर्षल पाटील या तरूण कंत्राटदाराने कामाची देयके मिळत नसल्यामुळे आत्महत्या केली आहे.

सांगली जिल्ह्याती वाळवा तालुक्यातील तांदुळवाडी येथील तरूण कंत्राटदार हर्षल पाटील यांनी देयके न मिळाल्याने कर्जाच्या ओझ्याखाली दबावात आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. जिल्ह्यातील कंत्राटदार विविध योजनांची कामे निविदेच्या माध्यमातून करीत आहेत. जवळपास कामे पूर्ण केलेली आहेत परंतू मागील एक वर्षापासून या कामांना शासन स्तरावरून निधी उप-लब्ध नाही त्यामुळे वेगवेगळ्या सर्व विभागाच्या अनेक योजनांची देयके प्रशासन स्तरावर प्रलंबीत आहेत. त्यामुळे सर्व कंत्राटदार आर्थिक संकटात आले आहेत. बँक आणि खाजगी सावकाराकडून कर्ज काढून कामे केल्यामुळे त्यांच्या कुटुंबीयांना एक कोटीची आर्थिक मदत द्यावी अन्यथा कंत्राटदार संबंधित कार्यालयासमोर काम बंद आंदोलन करणार असल्याचा इशारा मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश, निव-ासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवड यांना सादर केलेल्या निवेदनात देण्यात आला आहे.

कर्जाच्या ओझ्याखाली दबावात आहेत. यासाठी शासन स्तरावरून तत्काळ निधीची तरतूद करावी या मागणीसह जलजीवन मिशन योजनेंतर्गत कामाचा विलंब यासाठी कंत्राटदारास जबाबदार धरण्यात येऊ नये, निधी येईपर्यंत कुठल्याही बैठकीला बोलावून कंत्राटदारास जबरदस्ती काम करण्याचा तगादा लावू नये, सर्व नळ योजनेच्या कामांना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रमाणे प्रशासन स्तरावर सरसकट मुदतवाढ देण्यात यावी, लोकवर्गणीच्या कारणाने थांबविण्यात आलेला १० टक्के निधी तत्काळ देण्यात यावा, निधी अभावी प्रलंबीत असलेल्या कामांना दंड आकारण्यात येऊ नये, ग्रामपंचायत स्तरा-वर कागदोपत्री अडचणी असलेल्या योजनेच्या कामास झालेल्या विलंबामुळे सर्व अडचणी सोडवण्यात याव्यात व विलंबास कंत्राटदारास जबाबदार धरण्यात येऊ नये या मागण्यांचा समावेश आहे.

कंत्राटदारांचे प्रलंबीत देयके तत्काळ अदा करण्यात यावीत अन्यथा काम बंद आंदोलन करीत प्रशासकीय कार्यालयासमोर उपोषण करण्याचा इशारा कंत्राटदार संघटनेने दिला आहे. यावेळी पी पी मुळे, सत्यनारायण बोखारे, निश्चल यंबल, सुरेश शेळके, गजानन बांगर, भागवत भोयर, बालाजी वानखेडे, नितीन घुगे, संकेत चंदेल, गजानन सोनवणे, शंकर कोरडे, शिवाजी घुगे, सचिन कातोरे, गंगाधन नरवाडे, योगेश लोंढे, अॅड राजेश गोटे आदींची उपस्थिती होती.

# हुतात्मा बहिर्जी शिंदे यांच्या पुण्यतिथीनिमित्त गुणवंतांचा सत्कार




**तभा वृत्तसेवा**
**कळमनुरी, २४ जुलै**

येथील महात्मा ज्योतिबा फुले विद्यालयात हुतात्मा बहिर्जी शिंदे यांच्या पुण्यतिथीनिमित्त विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शरद सावंत तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ वसंतराव पतंगे, विलासराव भोसकर, चंद्रकांत देशमुख, बाबुराव वानखेडे, राज-ाराम बनसकर, एल जी शिंदे, पी के राठोड, डॉ प्रदीप विश्वंबर, जयंत काळे, अतुल बुर्से, नारायण शिंदे, डॉ राहुल पाटील, प्राचार्य तान्हाजीराव जगताप आदींची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुनील ठाकरे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते व्ही एस बोक्से यांनी हुतात्मा बहिर्जी शिंदे यांच्या धाडसी विचारांना उज-ाळा देत आपले विचार मांडले. त्यानंतर गुणवंतांचा गौरव करण्यात आला. यावेळी इयत्ता १० वीच्या ९० टक्के पेक्षा अधिक गुण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यालयाच्या वतीने २०० रू रोख पारितोषिक, प्रमाणपत्र आणि पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.त्यानंतर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातून सर्व शाखेच्या अनुक्रमे तीन विद्यार्थ्यांना रोख रक्कमेचे बक्षिस, प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देउन सन्मानित करण्यात आले. याच निमित्याने एनएमएमएस परीक्षा शिष्यवृत्ती, सारथी शिष्यवृत्ती, पूर्व प्राथमिक शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देउन अभिनंदन करण्यात आले. इयत्ता ५ तील विद्यार्थ्यास उत्कृष्ट तबला वादक म्हणून अध्यक्ष शरद सावंत व पर्यवेक्षक शेख यांच्या कडून प्रत्येकी ५०० रू असे रोख रू १००० बक्षीसं देऊन अध्यक्षांच्यावतीने स्वागत करण्यात आले. सकाळी प्रार्थना झाल्यानंतर क्रीडा शिक्षक डी आर ढोकणे, प्रा ए टी पवार, नेताजी शिंदे यांच्या पुढाकारातून इयत्ता ५ ते १२ वी च्या सर्व विद्यार्थ्यांची मुख्य मार्गाने प्रभातफेरी काढण्यात आली. यासाठी सर्व शिक्षक, प्राध्यापक बांधवांनी सहकार्य केले. या दोन्ही कार्यक्रमासाठी सांस्कृतिकविभागाचे सुनिल ठाकरे, बोक्से, धामणकर, गरड, बी के शिंदे यांच्यासह शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रकांत गरड, प्रा पंडित डाखोरे यांनी तर आभारप्रदर्शन सुनिल ठाकरे यांनी मानले.

# रोजगार मेळाव्यात ११२ उमेदवारांची प्राथमिक निवड

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ जुलै**

जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार उमेदवारांसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मॉडेल करिअर सेंटर व शिवाजी महाविद्यालय, हिंग-ोली यांच्या संयुक्त विद्यमाने नुकताच येथील शिवाजी म हाविद्यालयात पंडित दिनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यास जिल्ह्यातील दहावी, बारावी, आयटीआय, डिप्लोमा, पदवी व पदव्युत्तर या पात्रतेच्या २२७ उमेदवारांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ११२ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली आहे.

या रोजगार मेळाव्यात महाराष्ट्रातील विविध नामांकीत कंपनीचे उद्योजक उपस्थित होते. तसेच जिल्ह्यात विविध महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती देण्यासाठी विविध महामंडळाचे स्टॉल लावण्यात आले होते.

या मेळाव्यात मार्गदर्शन करताना शिवाजी महाविद्यालय संस्थेचे सचिव प्रणव पवार यांनी युवक-युवतींनी शासनाच्या विविध योजनाचा लाभ घ्यावा, असे सांगितले. प्राचार्य डॉ.बी. एस. क्षीरसागर यांनी चांगल्या ठिकाणी आत्म विश्वासाने मुलाखत द्यावी व नोकरीची संधी मिळवून घ्यावी, असा संदेश दिला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे सहायक आयुक्त बालाजी मरे यांनी रोजगार मेळाव्याचा हेतू विशद करताना म्हणाले, राज्य शासनाच्या कल्याणकारी योजनांमध्ये पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा हा एक योजनेचाच भाग आहे. यामध्ये जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार उमेदवारांना व स्थानिक पातळीवरील उद्योजक, महाराष्ट्रातील विविध कंपनीचे उद्योजक, रोजगार व स्वयंरोजगारासाठी इच्छूक उम ेदवार तसेच शासनाच्या विविध महामंडळामार्फत चालणाऱ्या योजना या सर्वांना एकाच छताखाली एकत्र आणून रोजगार व स्वयंरोजगासाठी उमेदवारांनी संधी दिली जात असल्याची माहिती दिली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार डॉ. धाराशीव शिराळे यांनी केले. या कार्यक्रमांच्या यशस्वीतेसाठी जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता हिंगोली या कार्यालयाचे नवनाथ टोनपे, राजाभाऊ कदम, नागेश निरदुडे, रमेश जाधव, पवन पांडे, प्रवीण राठोड, अभिजीत अलोने आणि शिवाजी महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ.एस.यु.ढाले, डॉ.बी.एस. जाधव, डॉ.इक्बाल जावेद, अय्याज फारुकी व इतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.



**हिंगोली- येथील नगर पालिकाअंतर्गत अग्नीशमन दलाला नुकतीच अत्याधुनिक व सर्व सोयी सुविधांनी युक्त अशी अग्नीशमन दलाची गाडी उपलब्ध झाली आहे. मुख्याधिकारी अरविंद मुंढे यांच्या पाठपुराव्यामुळे नगर पालिकेला अनेक साहीत्य शासनाकडून उपलब्ध केल्या जात आहेत. छाया- सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### लोकमान्य टिळक जयंती साजरी

हिंगोली- येथील जिल्हाधिकारी कार्यालयात आज लोकमान्य टिळक यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी लोकम ान्य टिळक यांच्या प्रतिमेला उपजिल्हाधिकारी (सामान्य) अनिल माचेवाड यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी नायब तहसीलदार डी. एस. जोशी, संतोष बोथीकर यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी-कर्मचारी यांनी लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करुन अभिवादन केले.

### किशोरवयीन जीवन कौशल्यअंतर्गत प्रशिक्षण



हिंगोली- जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. नितीन तडस यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्ष, जिल्हा रुग्णालय हिंगोली यांच्यातर्फे जिल्हा रुग्णालयातील डापकू सभागृहात आज जिल्ह्यातील शिक्षकांना किशोरवयीन जीवन कौशल्य कार्यक्रम अंतर्गत प्रशिक्षण देण्यात आले. यावेळी जिल्हा कार्यक्रम अधिकारी डी. एस.चौधरी यांनी एचआयव्ही/एड्स व आजचा युवक याविषयी मार्गदर्शन केले. डॉ. निशांत मानका यांनी युवकांचे मानसिक आरोग्य व व्यसनाधीनता यावर मार्गदर्शन केले. अनुराधा पथरोड यांनी किशोरवयीन जीवन कौशल्याविषयी तर श्रीमती लक्ष्मी वाठोरे यांनी गुप्तरोगाबद्दल उपस्थितांना म ार्गदर्शन केले. या प्रशिक्षणासाठी जिल्ह्यातील विविध शाळेतील शिक्षक उपस्थित होते. प्रशिक्षणाच्या यशस्वीतेसाठी संजय पवार, श्रीमती टीना कुंदणानी व आशिष पाटील यांनी परिश्रम घेतले.

### लासीना जि प शाळेतील रिक्तपदे भरा- जाधव

हिंगोली- तालुक्यातील लासीना जि प शाळेत वर्ग पहिली ते सातवीपर्यंत आहेत. शाळेत अनेक होतकरू विद्यार्थी असून अनेक विद्यार्थी जिल्हा परिषद शाळेमध्ये शिकून मोठे यश संपादन केले आहे. मात्र दिवसेंदिवस विद्यार्थी संख्या गटात चालल्याने शाळा बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. लासिना येथील जिल्हा परिषद शाळेत यापूर्वी वर्ग पहिली ते पाचवी पर्यंत विद्यार्थी संख्या ३०० ते ४०० पर्यंत होती. व वर्ग पाचवी पर्यंत शिक्षक पाच असायची. मात्र आता शिक्षक संख्या कमी होत असल्याने विद्यार्थी संख्या देखील घटत चालली आहे, विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी शिक्षकच उपलब्ध होत नसल्याने पालक आपल्या पाल्यांना इतर ठिकाणी शाळेमध्ये टाकत आहेत. याबाबत दोन पदे रिक्त असल्याची प्रशासनाच्या निदर्शनास आणून देखील, शिक्षक संख्या मिळत नसल्याने विद्यार्थ्यांची शैक्षणिक नुकसान होत आहे. त्यामुळे प्रशासनाने व संबंधित विभागाने याची दखल घ्यावी मागणी पवन जाधव पाटील यांनी शिक्षणाधिकारी यांच्याकडे केली आहे.

# भंते काश्यप यांचे कार्य सर्वांसाठी प्रेरणादायी- महाथेरो



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ जुलै**

अशिक्षित वृद्ध व दृष्टीने अंध असून सुद्धा भंते काश्यप महाथेरो यांनी समाजहिताचं जे काम केले आहे ते सर्व भिक्खू संघ व समाज बांधवांसाठी प्रेरणादायी आहे असे प्रतिपादन विपश्यनाचार्य भिक्खू पय्यारत्न महाथेरो यांनी केले.

हिंगोली येथील जेतवन बौद्ध प्रशिक्षण केंद्र अंधारवाडी येथे कालवश भंते काश्यप महाथेरो यांच्या ६ व्या स्मृतिदिनानिमित्त महिलामंडळाच्या वतीने दिनांक २३ जुलै बुधवार रोजी भिक्खूसंघाला भोजन दान व उपस्थितांना खिरदान आणि भिक्खू संघाच्या उपस्थितीत बौद्ध पूजापाठ कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी भंतेजीच्या पुण्यस्मृतीस अभिवादन करण्यासाठी पुज्य भिक्खू विपश्यनाचार्य पय्यारत्न महाथेरो, भंते चंद्रमुनी, भंते पय्यार्वधन, भंते धम्मघोष, भंते पय्याज्योती, भंते चंद्रमनी व भिक्खूसंघाची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी सुप्रिया महिला मंडळाच्या सर्व पदाधिकारी व प्रकाश इंगोले, जळबाजी शेवाळे, नंदकिशोर कांबळे, जी.के.इंगोले यांनी परिश्रम घेतले.

# कर्जमाफीसाठी शेतकऱ्यांचा धारफाटा येथे एक तास रास्तारोको



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ जुलै**

औंढा नागनाथ तालुक्यातील रूपूर येथील शेतकऱ्यांचा कर्जमाफी व शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्याच्या आश्वासनाची पूर्तता करा यासह विविध मागण्यांसाठी औंढा-जिंतूर रस्त्यावरील धार फाटा येथे गुरुवार( दि. २४ )रोजी सकाळी दहा वाजता एक तास रास्तारोको आंदोलन करण्यात आले. महायुती सरकारने निवडणुकीपूर्वी शेतकऱ्यांना सातबारा कोरा करण्याचे आणि कर्जमाफी देण्याचेही वचन दिले होते. तरी सरकारने या आश्वासनांची पूर्तता केलेली नाही. यामुळे सामाजिक कार्यकर्ते साहेबराव चव्हाण यांच्या नेतृत्वात धार फाटा येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.या रास्ता रोको आंदोलनात शिवसेना (ठाकरे गट )तालुकाप्रमुख ज्ञानेश्वर उर्फ म ाऊली झटे व रिपब्लिकन सेना युवा प्रदेशाध्यक्ष किरण घोंगडे, सामाजिक कार्यकर्ते साहेबराव चव्हाण, अँड बाळासाहेब मगर, बबनराव इघारे, माऊली मगर,विजय सांगळे,विशाल सांगळे, रोहिदास चव्हाण, गणेश राठोड, परमेश्वर राठोड, सुनील चव्हाण, बालाजी राठोड, विजय पुंडगे, पंढरीनाथ आडे, श्रीनिवास राठोड, विकास चव्हाण, संजय गीते, शेख कदीर शेख बशीर यांच्यासह शेतकरी सहभागी होते. औंढा नागनाथ तालुक्यातील धार फाटा येथे औंढा-जिंतूर रस्ता वर एक तास रस्तारोको आंदोलन करण्यात आले. आंदोलन संपल्यानंतर नायब तहसीलदार प्रवीण ऋषी यांना निवेदन देण्यात आले. रास्ता रोको आंदोलनामुळे रस्त्याच्या दोन्हीही बाजूस वाहनांच्या दुतर्फा रांगा लागल्या होत्या. यावेळी चोख पोलिस बंदोबस्त लावण्यात आला होता.

# विद्यार्थ्यांनी सभोवतालचा समाज समजून घेतला पाहीजे- डॉ. भिंगे



**तभा वृत्तसेवा**
**वसमत, २४ जुलै**

विद्यार्थ्यांनी मोबाईलचा अतिरेक टाळून पुस्तकाच्या जगात प्रवेश करावा. वाचनाने माणसाचे आयुष्य समृद्ध होते. संवादातून समाजाची प्रगती होत असते. परंतु, दुर्दैवाने माणसामाणसांतील संवाद नाहीसा होत आहे. विद्यार्थ्यांनी संवादी राहून आपल्या अवतीभोवतीचा समाज समजून घेतला पाहिजे, असे प्रतिपादन प्रसिद्ध लेखक, सम ीक्षक प्रा. डॉ. यशपाल भिंगे यांनी केले.

वसमत येथील श्री योगानंद स्वामी म हाविद्यालय, वसमत आयोजित माजी विद्यार्थी व पालक मिळाव्यात बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी सहकारमंत्री तथा संस्थाध्यक्ष डॉ. जयप्रकाश मुंदडा हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून वसमतच्या तहसिलदार सौ. शारदाताई दळवी, संस्थेचे सहसचिव श्री. राजेश मंचेवार, प्राचार्य डॉ .नागनाथ पाटील आदींची उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना डॉ.भिंगे म्हणाले की, म ाणसातील संवेदना नष्ट होत आहे.त्यामुळे माणूस जाणीविने समृद्ध झाला पाहिजे. विद्यार्थ्यांनी आपल्या गावाचा इतिहास समजून घ्यावा. आपल्या परिसरातील थोर, कर्तबगार माणसांच्या चरित्राचे वाचन करावे. त्यातून काळाची आव्हाने समर्थपणे पेलण्याची प्रेरणा मिळते. समाज केवळ बोलण्याने नव्हे तर कृतीने बदलत असतो. विद्यार्थ्यांनी कष्ट, परिश्रमावर विश्वास ठेवून सकारात्मकतेने जीवनाची वाटचाल करावी, यश हमखास मिळते असे त्यांनी शेवटी आवर्जून सांगितले.

या प्रसंगी बोलताना सौ.शारदा दळवी म्हणाल्या की, विद्यार्थी व पालक मेळावा अशा कार्यक्रम ातील विचारातून विद्यार्थ्यांमध्ये परिवर्तन घडून येते. तरुणांनी महाविद्यालयीन जीवनाकडे गांभीर्याने पाहावे. कारण हा काळ अत्यंत महत्त्वाचा व जी-वनाला आकार देणारा असतो. विद्यार्थ्यांनी चांगले संस्कार आत्मसात करून आपले भविष्य उज्ज्वल करावे. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना डॉ. जयप्रकाश मुंदडा म्हणाले की, विद्यार्थ्यांनी आई-वडिलांचे कष्ट विसरु नये. उच्च स्वप्न पाहून व ध्येयवादी होऊन प्रयत्न केल्यास यश हमखास मिळते. विद्यार्थ्यांमध्ये ज्ञान घेण्याची तळमळ असावी लागते. त्यासाठी अनेक ग्रंथांचे वाचन करावे. तसेच पालकांनी आपल्या मुलाकडे लक्ष दिले पाहिजे. जागरूक पालक आपल्या पाल्याच्या भविष्याला दिशा देतो. अशा उपक्रमांमधून विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व घडत असते, असे प्रतिपादन डॉ.मुंदडा यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ.नागनाथ पाटील यांनी केले. पाहुण्यांचा परिचय डॉ. बाळासाहेब भिंगोले यांनी करून दिला. कार्यक्रम ाचे सूत्रसंचालन डॉ.शशिकांत तोळमारे यांनी केले. तर आभार डॉ.काशीनाथ चव्हाण यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी डॉ. संदीप गोरे, डॉ, गजानन सारंग, डॉ.मीनाक्षी बोरीवाले यांसह सर्व प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमास विद्यार्थी, विद्यार्थिनी, माजी विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# जालना महानगरपालिकेवर भगवा फडकण्यासाठी तयारीला लागा -आमदार अर्जुनराव खोतकर



## आढावा बैठकीत आमदार अर्जुनराव खोतकर यांचे पदाधिकाऱ्यांना आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

आगामी होऊ घातलेल्या जालना शहर महापालिका निवडणूक संदर्भात आज दिनांक २४ जुलै २०२५ रोजी जालना जालना शिव–सेना शहर शाखा व प्रमुख पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक भाग्यनगर संपर्क कार्यालयात आमदार अर्जुनराव खोतकर यांनी घेतली.बैठकीमध्ये प्रभाग निहाय सर्व प्रमुख पदाधिकाऱ्यांशी चर्चा करून त्यांच्या प्रभागातील शिवसेनेचा आढावा घेण्यात आला त्यांच्या प्रभागात शिवसेनेला महापालिका निवडणूक संदर्भात कसे पोषक वातावरण आहे याची परिस्थिती जाणून घेतली,व कार्यकर्त्यांनी आपण शहरांसाठी विविध विकास कामासाठी मोठ्या प्रमाणावर शासनाकडुन निधी उपलब्ध करून घेतला यामधून अनेक विकास विकासाची कामे पूर्ण झाली असून अनेक काही कामे प्रगती पथावर आहेत. काही कामे सुरू असून काही कामे निवीदा स्तरावर आहेत. शहरांमधील नवीन विकास कामाचे प्रस्ताव देखील शासन स्तरावर मंजुरीसाठी सादर आहेत.या कामासंदर्भात सर्वसामान्य नागरिकांमध्ये प्रसिद्ध करावी.मतदारामध्ये शिवसेनेबद्दलचा विश्वास निर्माण करून घ्यावा. केलेले विकास कामे सर्व सामान्य जनतेपर्यंत पोहोचण्याचे काम प्रमुख पदाधिकारी व शिवसैनिकांनी करावे.

हिंदूहृदयसम्राट सन्माननीय बाळासाहेब ठाकरे यांच्या ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण या विचारसरणीवर प्रत्येक शिवसैनिकाने तंतोतंत पालन करून आपल्या भागातील जनतेच्या सुख दुःखात नेहमी सहभागी राहावे. आपल्या भागात शिव–सेना ,युवासेना ,महिला आघाडी, च्या शाखा स्थापन कराव्यात घर तेथे शिवसैनिक ही संकल्पना आपल्या भागात राबवावी. आगामी महानगरपालिका निवडणूकीत पहिला महापौर शिवसेनेचा कसा होईल यासाठी आतापासून जोमाने कामाला लागावे असे आवाहन उप–स्थित सर्व प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना आमदार खोतकर यांनी व्यक्त केले. याप्रसंगी जिल्हा संपर्कप्रमुख पंडितराव भुतेकर, सहसंपर्क एडवोकेट सुनील किनगावकर, शिवसेना शहरप्रमुख विष्णूभाऊ पाचफुले, गणेशसेठ राऊत, उपजिल्हाप्रमुख संतोष मोहिते, उपजिल्हाप्रमुख गणेश सुपारकर, योगेश रत्नपारखे, दीपक वैद्य, अल्पसंख्यांक शहर प्रमुख जफर खान, दिनकर घेंवंदे, मेघराज चौधरी,राहुल हिवराळे, महेश दुसाने, सविता केवंडे, विजया चौधरी, यांच्यासह शहरातील सर्व आजी–माजी नगरसेवक, विभाग प्रमुख,उप विभाग प्रमुख, महिला आघाडी,दलीत आघाडीचे प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संक्षिप्त

### जागर श्यामच्या कथांचा – विद्यार्थ्यांना संस्काराचे धडे



**तभा वृत्तसेवा**
**टेंभुर्णी/प्रतिनिधी**

जाफराबाद तालुक्यातील टेंभुर्णी येथील नवभारत शिक्षण संस्थेच्या, श्रीमती.जे.बी. के. विद्यालय व नवभारत उच्च माध्यमिक विद्यालयात दररोज सकाळी शाळेच्या वेळेत जागर श्यामच्या कथांचा हा कथा अभिवाचनाचा कार्यक्रम घेतल्या जात आहे. अखिल भारतीय साने गुरुजी कथामाला, शाखा. हेलस,ता.मंठा. व जालना जिल्हा. शाखा, यांच्या वतीने प्रत्येक शाळेत विद्यार्थ्यांना संस्काराचे धडे मिळावेत म्हणून ध्वनी मुद्रना द्वारे परिपाठाच्या वेळी ह्या कथा विद्यार्थी अतिशय आत्मीयतेने , तन्मयतेने श्रवण करीत आहेत, महाराष्ट्रातील समाजसुधारक व मातृ हृदयी आदर्श शिक्षक पांडुरंग सदाशिव साने यांनी नाशिकच्या तुरुंगात शिक्षा भोगत असतांना १९३३ मध्ये श्यामची आई हे आत्मचरित्र लिहिले होते.या आत्मचरित्रावर आचार्य. प्र.के.अत्रे यांनी १९५३ मध्ये श्यामची आई हा चित्रपट काढला होता, पुस्तक रूपाने व चित्रपटामुळे श्यामची आई या आत्मचरित्रातील संस्कार कथा घरा–घरात पोहोचल्या होत्या, आजच्या पिढीला सुद्धा मातेची ममता, तळमळ, आईचं प्रेम, जिव्हाळा, त्याग कळावा, आई– वडील आपल्या लेकरांना घडवितांना कोणकोणत्या प्रसंगाला सामोरे जातात, लेकरांना चांगले संस्कार देण्यासाठी आदर्श नागरिक बनविण्यासाठी काय काय धडपड त्यांना करावी लागते हे , श्यामच्या आईच्या कथा श्रवण केल्याने लक्षात येते,आज प्रत्येक विद्यार्थी, पालक, कुटुंबातील प्रत्येक घटक यांनी श्यामची आई ह्या आत्मचरित्रातील कथा वाचून घेतल्या, ऐकल्या,श्रवण केल्या, तर आदर्श समाज निर्माण होईल, एवढी अनमोल विचारधारा या कथांमध्ये आहे. जागर श्यामच्या कथांचाया उपक्रमात राजेंद्र जोशी छत्रपती संभाजीनगर , यांनी अभिवाचन निर्मिती केली असून, उपविभागीय अधिकारी अंजली धानोरकर. छत्रपती संभाजी नगर, यांच्या अप्रतिम,सुरेल,ओघवत्या, सुंदर आवाजातील अभिवाचन ऐकुण विद्यार्थी मंत्रमुग्ध होत आहे. या कथांमधून श्रमाचे मूल्य,आई बाबांचा जिव्हाळा, त्याग, प्रेम, करूणा, आत्मियता, कळते बहिण–भावाच्या जिव्हाळ्याचा उलगडा होतो, मित्रा–मित्रांमधिल ओढ ,आपुलकी, मैत्रीभाव कळतो, कोणतं ही काम हलकं नसतं हे सहज मनांवर बिंबविल्या जातं, श्रम प्रतिष्ठेचा पुरस्कार केल्या जातो, अनेक नातेसंबंधातील रेशीम पदर उलगडून दाखवले जातात, त्यामुळे दररोज सकाळी शाळेच्या वेळेत जागर श्यामच्या कथांचा हा उपक्रम विद्यार्थी अतिशय तल्लीनतेने श्रवण करीत आहेत, या उपक्रमाला जिल्ह्यातील विविध प्रशालेतुन उत्तम प्रतिसाद लाभत आहे. दररोजच्या परिपाठा मध्ये जवळपास ४२ कथा विद्यार्थ्यांना ऐकायला मिळणार आहे, सकाळ च्या प्रसन्न वातावरणात श्यामच्या आईच्या कथा ऐकून विद्यार्थी भारावून जात आहे. प्राचार्य. नंदकुमार काळे व जेष्ठ शिक्षक एस.बी.बोरकर हे कथा अभिवाचन संपल्यानंतर, कथांचा सारांश व बोध याचे सुंदर,अप्रतिम विवेचन करतात. त्यामुळे विद्यार्थ्यांना जागर श्यामच्या कथांचा हा उपक्रम अतिशय हवाहवासा व आपलासा वाटत आहे.या अभिवाचनामुळे विद्यालयातुन आदर्श विद्यार्थी घडतील असा आशावाद शिक्षक प्राध्यापक यांनी व्यक्त केला आहे.

### वंचित बहुजन आघाडी परतुर तालुक्याची जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक संदर्भात आढावा बैठक संपन्न झाली



**तभा वृत्तसेवा**
**परतुर/प्रतिनिधी**

परतूर आगामी पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडी परतुर तालुक्याच्या वतीने एक महत्त्वपूर्ण बैठक परतूर येथील शासकीय विश्रामगृहात पार पडली. ही बैठक परतुर तालुका अध्यक्ष रवींद्र भदर्गे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. मराठवाडा उपाध्यक्ष दिपक डोके जिल्हा कार्याध्यक्ष परमेश्वर खरात जिल्हा उपाध्यक्ष रोहन वाघमारे यांनी मार्गदर्शन केले बैठकीत आगामी निवडणुकांमध्ये वंचित बहुजन आघाडीची भूमिका, रणनीती, आणि उमेदवार निवडीच्या प्रक्रियेवर सविस्तर चर्चा करण्यात आली. स्थानिक पातळीवर जनसंपर्क वाढवणे, मतदारांमध्ये जागरूकता निर्माण करणे, आणि संविधानिक मूल्यांवर आधारित प्रचार मोहिम राबवण्याचे निर्देश यावेळी देण्यात आले.

या बैठकीस तालुक्यातील विविध पदाधिकारी, कार्यकर्ते, तसेच युवा व महिला आघाडीचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आगामी निवडणुकांमध्ये वंचित बहुजन आघाडीला मजबूत पर्याय म्हणून उभे करण्यासाठी कार्यकर्त्यांनी जोमाने तयारीला लागण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

उपस्थित मराठवाडा उपाध्यक्ष दिपक डोके जिल्हा कार्याध्यक्ष परमेश्वर खरात जिल्हा उपाध्यक्ष रोहन वाघमारे जिल्हा संघटक हनुमंत मोरे तालुका अध्यक्ष रविंद्र भदर्गे तालुका महासचिव दिपक वक्ते तालुका उपाध्यक्ष महादेव पैठणे तालुका उपाध्यक्ष गौतम मुंढे तालुका उपाध्यक्ष उत्तम साळवे तालुका महासचिव नामदेव नाचन सातोना आकाश वाघमारे सर्कल अध्यक्ष राजु गोटे आष्टी सर्कल अध्यक्ष अनिल वाघमारे आष्टी सर्कल उपाध्यक्ष आकाश साळवे वाटूर सर्कल अध्यक्ष अमोल जाधव वाटूर सर्कल महासचिव गौतम कोळे मनोज वंजारे मिलिंद गायकवाड दिपक नाटभजन तुषार कोळे संपत हिवाळे आदी मान्यवर उपस्थित होते.

## मुसळधार पावसाने शेती पिकांचे नुकसान

### तात्काळ पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी -किसनराव मोरे

**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधी**



मंठा तालुक्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे शेती पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. तळणी व जयपुर मंडळात मुसळधार पावसाने तर मंठा आणि गोसावी पांगरी महसुल मंडळात अनेक शेतातील बांध फुटल्याने पिकांचे मोठे नुकसान झाले असून, काही ठिकाणी तलाव फुटले आहेत. या पार्श्वभूमीवर पंचायत समितीचे माझी उपसभापती किसनराव मोरे यांनी बांधावर जाऊन नुकसानीची पाहणी करून पंचनामे संदर्भात महसूल अधिकाऱ्यांशी संवाद साधला.

यासंदर्भात प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात श्री. मोरे यांनी पुढे म्हटले आहे की, जयपुर मंडळातील बेलोरा शिवारातील तीन तलाव फुटून नदीनाल्याचे पाणी नदी काठच्या शेतात शिरल्याने शेत खरडून गेले असून, शेतीसह पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. ढोकसाळ मंडळातील तळेगाव, नायगाव, ढोकसाळ, तळे रामतीर्थ, गारटेकी बेलोरा, सरहद वडगाव, बेलोरा गावांसह परिसरातील अनेक गावातील शेतकऱ्यांच्या शेतीसह पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहेत.

खरीप पेरणीनंतर तब्बल दीड महिन्याने मंठा तालुक्यात एक आठवड्यापासून वेग–वेगळ्या परिसरात मुसळधार पाऊस पडत आहे. त्या पावसाचा शेतकऱ्यांच्या पिकांना चांगलाच तडाखा बसला आहे. त्यामुळे शेतकरी हतबल झाले असून, शासनाने तात्काळ पंचनामे करण्याचे आदेश द्यावेत आणि तातडीने अहवाल मागवून नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी किसनराव मोरे यांनी केली आहे. तालुक्यात सोमवारी रोजी रात्री पडलेल्या मुसळधार पावसाने बऱ्याच ठिकाणी तलाव फुटले असून, रस्त्यावरील पूल देखील वाहून गेले आहेत. त्यामुळे मागील २०–२५ वर्षात झालेल्या तलावांच्या कामाची चौकशी करून ज्या विभागाने हे तलाव केले त्या विभागातील संबंधित अधिकाऱ्यांसह गुत्तेदारांवर कडक कारवाई करावी. तसेच त्यांच्याकडून नुकसान भरपाईची रक्कम वसूल वसूल करावी, अर्थ मागणीही मोरे यांनी केली आहे.यावेळी सरपंच संजय जाधव , जय राठोड , छगन वाघ , प्रल्हाद सरकटे , जितेंद्र सरकटे यांच्यासह आदींची उपस्थिती होती.

## पारधचे माजी सरपंचांनी घेतली अक्कलकोटच्या राजेंची सपत्नीक भेट



**तभा वृत्तसेवा**
**पारध/प्रतिनिधी**

भोकरदन तालुक्यातील पारध येथील माजी सरपंच अशोक लोखंडे व त्यांच्या पत्नी लता लोखंडे यांनी नुकतीच अक्कलकोट येथे जाऊन अक्कलकोटच्या श्री स्वामी समर्थ प्रसादालयाचे प्रमुख जन्मयेजय राजे यांची सपत्नीक भेट घेतली.

पारध आणि अक्कलकोटचा ऐतिहासिक रित्या अत्यंत जवळचा संबंध आहे. अक्कलकोटचे जे राजे भोसले आहे ते पूर्वीचे पारध येथील लोखंडे होते असा उल्लेख बिंदू माधव या लेखकाने लिहिलेल्या स्वराज्याची दुफळी या ऐतिहासिक पुस्तकात वाचायला मिळते.तसा शिलालेख देखील अक्कलकोट येथील राजवाड्यात पहावयास मिळतो.मागील दोन महिन्यांपूर्वी अक्कलकोट संस्थानच्या प्रसादलयाचे प्रमुख जन्मयेजय राजे यांनी पारध गावाला सदिच्छा भेट देऊन येथील ऐतिहासिक पुरातन गढ्या,बुरुज,राजवाडा पाहून समाधान व्यक्त केले.त्याच वेळेस त्यांनी उद्गार काढले की पारध येथील कोणीही व्यक्ती अक्कलकोटला स्वामींच्या दर्शनाला आल्यास मला भेटल्या शिवाय राहू नका ,मला माझ्या मातृभूमी आणि तेथील माणसांचा सार्थ अभिमान आहे आणि भविष्यात राहील असे भावनिक उद्गारही त्यांनी यावेळी काढले.त्यांच्या म्हणण्यानुसार पारध येथील माजी सरपंच अशोक लोखंडे, त्यांच्या पत्नी सौ .लता यांनी अक्कलकोट येथे स्वामी समर्थ दर्शनासाठी गेले असता त्यांनी जन्मयेजय राजे यांची भेट घेतली यावेळी राजेंनी लोखंडे दांपत्याचा यथोचित सत्कार केला.

## सागर मत्स्य व्यवसाय सहकारी संस्थेच्या निवडणुकीत भ्रष्टाचाराचा आरोप

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

परतूर तालुक्यातील सागर मत्स्य व्यवसाय सहकारी संस्था मर्यादित परतूर या संस्थेच्या निवडणुकीत प्रचंड गैरव्यवहार झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या संदर्भात संस्थेचे सभासद सागर काजळे यांनी सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था पुणे यांना निवेदन दिले असून संपूर्ण प्रकाराची चौकशी करून संबंधितांवर कारवाईची मागणी केली आहे. जिल्हाधिकारी तसेच मुख्यमंत्री व इतर विभागांनाही निवेदनाच्या प्रती पाठविण्यात आल्या आहेत. निवेदनात म्हटले की, निवडणूक प्राधिकृत अधिकारी आ. सां. गुसिंगे, सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (दुग्ध), जालना यांनी नियोजित वेळेनुसार निवडणूक प्रक्रिया राबवली नाही. सकाळी साडेदहा वाजल्यापासून सुरू होणारी ही प्रक्रिया नियमानुसार दुपारी सव्वा एक वाजेपर्यंत पूर्ण व्हायची असताना, संबंधित अधिकाऱ्यांनी ती नियमबाह्य पद्धतीने दुपारी तीन वाजल्यानंतर मतदान घेऊन पूर्ण केली. या निवडणुकीत लाखो रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचा आरोपही करण्यात आला असून, एकतर्फी आणि अपारदर्शक पद्धतीने ही प्रक्रिया पार



पाडल्याचा ठपका लावण्यात आला आहे. त्यामुळे या निवडणुकीस पूर्णपणे अमान्य ठरवून, प्राधिकृत अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात यावी आणि संपूर्ण निवडणूक प्रक्रियेची उच्चस्तरीय चौकशी करून फेर निवडणूक घेण्यात यावी, अशी मागणी सभासद सागर दगडू काजळे यांनी केली आहे. जर प्रशासनाने या प्रकाराची दखल घेतली नाही, तर निवडणुकीवर बहिष्कार टाकलेले सभासद जिल्हाधिकारी कार्यालय जालना येथे तीव्र आंदोलन छेडतील, असा इशाराही देण्यात आला आहे. या आंदोलनासोबत उद्भवणाऱ्या सर्व परिस्थितीस निवडणूक प्राधिकृत अधिकारी गुसिंगे व बी. टी. लिंगायत हे जबाबदार असतील, असेही निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.

## अपघात ग्रस्तांच्या वारसांना आ.संतोष दानवे यांच्या हस्ते आर्थिक साहाय्य वाटप



**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**

गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेअंतर्गत भोकरदन तालुक्यातील ४० तर जाफ्राबाद तालुक्यातील ८ अशा एकूण ४८ अपघातग्रस्तांच्या वारसांना ९५ लक्ष रुपये अनुदानाचे वाटप गुरुवार दिनांक २४ जुलै २०२५ रोजी आमदार संतोष पाटील दानवे यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. यावेळी मा.जि.प. सदस्या सौ. आशाताई पांडे, जि.प. सदस्य डॉ. चंद्रकांत साबळे, भाजपा माजी तालुकाध्यक्ष गणेश ठाले, तालुका कृषी अधिकारी अमोल शिंदे, गटविकास अधिकारी महेंद्र साबळे आदी मान्यवरांची उप–स्थिती होती.

यावेळी बोलताना आमदार संतोष पाटील दानवे म्हणाले की, राज्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या शेतकरी बांधवांचे जीवन हे अनेक संकटांनी ग्रासलेले असून त्यातील प्रमुख संकट म्हणजे अपघात आहे. अपघातामुळे शेतकरी मृत्यू पावला वा त्यास अपंगत्व आले तर त्याच्या संपूर्ण कुटुंबास आर्थिक समस्यांचा मोठ्या प्रमाणावर सामना करावा लागतो. त्यामुळे शेतकरी बांधवांना या संकटातून वाचवण्यासाठी गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना महाराष्ट्र शासनाच्या वतीने सुरू करण्यात आली आहे. पुढे बोलताना ते म्हणाले की, कुटुंबातील करता माणूस हरपल्याचे दुःख शब्दात व्यक्त करणे अशक्य असून शासनाच्या वतीने देण्यात येणारी आर्थिक मदत ही त्याची नुकसान भरपाई होऊ शकत नाही. परंतु अशा परिस्थितीत कुटुंबाला आर्थिकदृष्ट्या सावरणे आवश्यक आहे. त्यामुळे शासनाची ही आर्थिक मदत या कुटुंबांना सावरण्यासाठी मदत करेल असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

## जबरी चोरी करणारा गुन्हेगार व विधीसंर्घषग्रस्त बालक जेरबंद

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जालना : जालना देऊळगाव राजा रोडवर दिनांक २२/०७/२०२५ रोजी कामानिमीत्त आलेल्या दोन व्यक्तींना देवळगावराजा रोडवर आनंदगड जवळ परत जात असताना दोन अज्ञात आर–ोपीतांनी चाकुचा धाक दाखवुन त्यांचेकडील रोख रक्कम व दोन मोबाईल जबरीने चोरी केले प्रकरणी पोलीस ठाणे तालुका जालना येथे गुन्हा दाखल झाला. सदर चा गुन्हा उघडकीस आणणे बाबत मा. पोलीस अधीक्षक श्री. अजयकुमार बंसल साहेब व अप्पर पोलीस अधिक्षक



साहेब जालना श्री आयुष नोपानी यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव यांना सुचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा जालना यांनी पथकातील अधिकारी व अंमलदार यांना सदरचा गुन्हा उघडकीस आणणेबाबत सुचना देवुन मार्गदर्शन केले होते. त्यानुषंगाने दिनांक २२/०७/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेतील पोलीस अधिकारी व अंमलदार हे नमुद गुन्ह्यातील अज्ञात गुन्हेगारांचा शोध घेत असतांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, सदरचा गुन्हा हा आरोपी नामे अभय दिलीप डोंगरे वय २१ वर्ष रा. कन्हैयानगर जालना याने एक विधीसंर्घषग्रस्त बालक याच्या मदतीने केल्याची खात्रीलायक माहिती मिळाली. त्यानुसार अभय दिलीप डोंगरे रा. कन्हैयानगर जालना याचा शोध घेऊन त्याचेकडुन सदरचा गुन्हा उघडकीस आणुन गुन्ह्यातील चोरी गेलेल्या मुद्देमालासह एकुण रु.२६५००/– किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. सदर प्रकरणात पोलीस ठाणे तालुका जालना येथे गुरनं. ५०४/२०२५ कलम ३०९ (४) इछ्ड प्रमाणे गुन्हा दाखल असुन सदर गुन्हा उघडकीस आणला आहे. तरी नमुद आरोपीस पुढील तपासकामी तालुका जालना यांच्या ताब्यात दिले आहे. सदरची कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. अजयकुमार बंसल साहेब व अप्पर पोलीस अधिक्षक साहेब जालना श्री आयुष नोपानी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव, सपोनि श्री योगेश उबाळे पोउपनि श्री. राजेंद्र वाघ, पोलीस अंमलदार सॅम्युअल कांबळे भाऊराव गायके, रमेश राठोड, प्रभाकर वाघ ,संदीप चिंचोले, संजय सोनवणे चालक अशोक जाधवर सर्व स्था. गु. शा. जालना यांनी केली आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com



बीड : शहरात वाहतूक नियमांची ऐशी तैशी अन् कारवाई फक्त खेड्यातल्या वाहनचालकांवर असे वाहतूक शाखेचे काम आहे. शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात ट्रिपल सीट दुचाकी अशा सुसाट धावतात. (छाया कृष्णा शिंदे)

# ना.पंकजाताई मुंडेंचा वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी होणार साजरा

## शैक्षणिक साहित्य, वृक्षारोपण, निराधाराना ब्लँकेट वाटप स्वच्छता मोहिम असे विविध सामाजिक उपक्रम राबवनार-राजेश गित्ते



**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२४ जुलै**

लोकनेत्या महाराष्ट्र राज्य पर्यावरण आणि पशुसवर्धन मंत्री मा.ना.पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्यात येणार असून यानिमित्त दि.२६ जुलै रोजी विविध शैक्षणीक व सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहीती परळी वैजनाथ भाजपा तालुका अध्यक्ष राजेश गित्ते यांनी दिली.

मा. ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त परळी वैजनाथ भाजपा तालुक्याच्या वतीने गुरुदास अनाथआश्रम घाटनांदूर येथे अन्नदान ,करण्यात येणार असून, याबरोबरच जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सेलू (परळी), जिरेवाडी , टोकवाडी येथे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शैक्षणीक साहीत्याचे वाटप, कालभैरव मंदिर मांडवा, केदारेश्वर मंदिर वैजवाडी, रत्नेश्वर मंदिर टोकवाडी, बेलेश्वर मंदिर बेलंबा येथे वृक्षारोपण वडगांव (दा) येथील राष्ट्रमाता अहिल्यादेवी होळकर, कन्हेरवाडी येथील बुद्ध विहार, लोणी येथील सावता महाराज मंदिर धर्मापुरी येथील दरगाह येथे स्वच्छता मोहिम राबविण्यात येणार आहे. वैद्यनाथ मंदीर परिसरातील



निराधार व्यक्तींना ब्लँकेट वाटप करण्यात येणार आहेत.या कार्यक्रमास सर्व पदाधिकारी, सरपंच, चेअरमन शक्ती केंद्रप्रमुख, बूथ प्रमुख, कार्यकर्ते यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन भाजपा तालुका अध्यक्ष तथा राजेश गित्ते यांनी केले आहे.

# जनसंग्राम संघटनेच्या सोनपेठ तालुकाध्यक्षपदी कदम

## जनसंग्राम संघटनेचे विचार तळागाळातील घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी प्रयत्न करावेत- संस्थापक अध्यक्ष तुळशीराम पवार

**तभा वृत्तसेवा**
**सोनपेठ दि.२४ जुलै**

नेक कर्म, मानवता हाच धर्म हे ब्रीद घेऊन निघालेल्या जनसंग्राम संघटनेच्या सोनपेठ तालुका अध्यक्षपदी कुशांभर कदम तर युवक आघाडीच्या तालुका उपाध्यक्ष पदी बालाजी कलींदर यांची निवड नुकतीच करण्यात आली. सोनपेठ तालुक्यातील कार्यकर्त्यांची बैठक मोठ्या उत्साहात संपन्न झाली. या निवडीचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.



सोनपेठ तालुक्याची जनसंग्राम संघटनेची महत्वपूर्ण बैठक दि.२३ जुलै२०२५ रोजी निळा येथे पार पडली. संदरील बैठकीस जनसंग्राम संस्थापक अध्यक्ष तुळशीराम पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. या बैठकीत सर्वानुमते सोनपेठ तालुकाध्यक्षपदी कुशांभर कदम तर युवक आघाडीच्या तालुका उपाध्यक्ष पदी बालाजी कलींदर यांची निवड संस्थापक अध्यक्ष तुळशीराम पवार यांच्या हस्ते नियुक्तीपत्र तसेच शाल, श्रीफळ, पुष्पहार घालून सत्कार करून करण्यात आली.

यावेळी जनसंग्राम संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तुळशीराम पवार कार्यकर्ता बैठकीस संबोधित करताना म्हणाले की, जनसंग्राम संघटनेच्या माध्यमातून आपल्याला गरजवंतांच्या, वंचितांच्या, रंजल्या-गांजल्यांच्या अडचणी सोडवायच्या आहेत. ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण हे तत्व उराशी बाळगून नेक कर्म, मानवता हाच धर्म... हे ब्रीद हाती घेऊन वाटचाल करायची आहे. त्यामुळे सर्व कार्यकर्त्यांनी जनसंग्राम संघटनेचे विचार तळागाळातील घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी प्रयत्न करावेत. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी जनसंग्राम संघटनेच्या शाखा गावोगावी उघडाव्यात. व जनसंग्राम संघटनेची व्यापक चळवळ निर्माण करावी. असेही पवार म्हणाले.

या प्रसंगी नवनिर्वाचित जनसंग्राम संघटनेचे सोनपेठ तालुकाध्यक्ष कुशांभर कदम, युवक आघाडीचे तालुका उपाध्यक्ष बालाजी कलींदर यांचा सत्कार करून पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी ऊकडगाव चे सरपंच भाऊसाहेब मोरे, अल्पसंख्यांक आघाडी तालुकाध्यक्ष परळी वहाब पटेल, जनसंग्राम संघटना अल्पसंख्यांक आघाडीचे परळी शहराध्यक्ष शेख हबीबभाई मिस्त्री, मोहन बेद्रे, ओमकार गुंजाळ, सुदर्शन हरंगुळे, बालाजी कलिंदर, वैभव कलिंदर, अर्जुन बेद्रे, महारुद्र कसबे, अमर चव्हाण, ओमकार कलिंदर, निलेश गीते, पांडुरंग बोडके, संजय इंगळे, गजानन रेवले, साहेबराव दंडवते, भरत रेवले, गोपीनाथ जाधव, श्रीराम जाधव, माणिक शिंदे, ऊकडगाव चे सरपंच भाऊसाहेब मोरे, लक्ष्मण महाराज, अमर चव्हाण, मुंजाभाऊ आढाव, माऊली कदम, माणिक शिंदे, बंडू आढाव आदिसह असंख्य पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.







# भर पावसात अंगणवाडी सेविका व मदतनीस महासंघाचे जिल्हा परिषदसमोर विविध मागण्यांसाठी तीव्र निदर्शने

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२४ जुलै**

बीड जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण भागातील सर्व अंगणवाडी सेविका व मदतनीस भगिनींना सुचित करण्यात येते की, सध्या एफ. आर. एस. च्या माध्यमातून अंगणवाडी सेविकांना दरमहा टी. एच. आर. वाटप करायचे सांगितले आहे. हे काम अंगणवाडी सेविका करण्याचा प्रयत्न करत आहेत. परंतु त्यात बऱ्याच अडचणी निर्माण होत आहेत. ओटीपी मिळत नाही, फोटो कॅप्चर लवकर होत नाही, बऱ्याच भागात नेटवर्क मिळत नाही, मोबाईल फोन हँग होत आहे, अशा अनेक अडचणींना अंगणवाडी सेविकांना सामोरे जावे लागत आहे. एफ आर एस च्या माध्यमातून काम करण्यासाठी प्रचंड दबाव अंगणवाडी सेविकावर प्रशासनाकडून येत आहे. त्यामुळे अंगणवाडी सेविका धास्तावल्या आहेत. यातून योग्य मार्ग काढावा व अंगणवाडी सेविकांना तणावमुक्त वातावरणात काम करण्याची संधी उपलब्ध करून द्यावी. तसेच पेन्शन, ग्रॅच्युईटी, ऑक्टोबर २४ ते जून २५ चा राज्य सरकारने मंजूर केलेला प्रोत्साहन भत्ता सरसगट सर्वांना द्यावा, जुलै २०२५ पासून प्रोत्साहन भत्ता नियमित मानधनात वर्ग करून अंगणवाडी सेविकांना पंधरा हजार रुपये व मदतनिसांना साडेआठ हजार रुपये दर महा मानधन देण्यात यावे. मा. आयुक्तांच्या आदेशानुसार अंगणवाडी उघडी ठेवण्याची वेळ सकाळी ९.३० ते दुपारी २.३० असताना प्रशासनाकडून चार वाजेपर्यंत सक्तीने अंगणवाडीत बसायला अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना सांगण्यात येत आहे. ते बंद करावे. या व इतर मागण्यासाठी आज २४ जूलै २०२५ रोजी जिल्हा परिषद बीडसमोर तीव्र निदर्शने व धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी जिल्ह्यातील सर्व अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्यासह भगवान देशमुख, कमल बांगर, दत्ता देशमुख, सचिन आंधळे उपस्थित होते.

# नानाजी देशमुख विद्या मंदिरमध्ये विद्यार्थी प्रयोजनातून टिळकांची जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२४ जुलै**

दीनदयाल शोध संस्थान संचलित, नानाजी देशमुख विद्या मंदिर बीड येथे लोकमान्य टिळकांची जयंती साजरी करण्यात आली. त्यावेळी मार्गदर्शिका सुनंदाताई कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली व्यासपीठावर गोकुळ शिशु वाटिका प्रमुख सौ आरती ताई जोशी आणि विद्यार्थ्यांमधील अध्यक्ष कृष्णाई खांडे तसेच प्रमुख पाहुणे भार्गवी लांडे हया लाभल्या होत्या. सर्वप्रथम लोकमान्य टिळकांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले. व कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना वाव मिळावा म्हणून प्रत्येक कार्यक्रमाप्रमाणेच हा कार्यक्रम देखील विद्यार्थ्यांनी सादर केला . त्यामध्ये तनुष




कुलकर्णी याने कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. त्यानंतर श्रेयसी शिरसट, देव क्षीरसागर, आर्यन पौळ, श्री बिक्कड, श्रीशा गर्जे, अर्णा मोहोळकर, जीवा माळी, आदिश्री केकान, सीया दुधाने या विद्यार्थ्यांनी भाषणे केली. आणि अनिताताई कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना लोकमान्य टिळकांविषयी प्राथमिक स्तरावर माहिती सांगितली. विद्यार्थ्यांमधून वैभवी धापसे या विद्यार्थिनीने सर्वांचे आभार मानले. कार्यक्रमासाठी सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते. सर्वांच्या सहकार्याने कार्यक्रम सुंदर रित्या सादर झाला.

# ना.पंकजाताई मुंडेंना वाढदिवसानिमित्त कार्यकर्त्यांकडून गोमातेची अनोखी भेट पुंगनूर जातीच्या गोमातेचे रामटेकवर आगमन ; औक्षण, पूजनाने झाले स्वागत

**तभा वृत्तसेवा**
**मुंबई दि.२४ जुलै**

राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांना कार्यकर्त्यांनी वाढदिवसानिमित्त पुंगनूर जातीच्या गायींची अनोखी भेट दिली. रामटेक निवासस्थानी त्यांनी औक्षण व पूजन करत गायींचे जोरदार स्वागत केले. या अनोख्या भेटीने आनंदित झालेल्या पंकजाताईंनी ही गोड भेट माझ्या कायम स्मरणात राहील असं म्हटलं.

पुंगनूर हा शुध्द भारतीय गोवंश असून ही गाय जगातील सर्वात लहान उंचीची गाय मानली जाते. आंध्र प्रदेशातील चित्तूर जिल्ह्यातील पुंगनूर तालुक्याच्या नावाने ही ओळखली जाते. आकार लहान असला तरी तिच्या दुधाला आरोग्यदायी गुणधर्म असतात. या दुधामध्ये एटू प्रकारचे प्रथिन आढळतात, जे शरीरासाठी उपयुक्त मानले जाते.



### वाढदिवसानिमित्त भेट

भाजपचे कार्यकर्ते चंद्रकांत फड, विष्णू घुले, भारत तोंडे यांनी पंकजाताईंना वाढदिवसानिमित्त ही अनोखी भेट दिली. बुधवारी रामटेक बंगल्यावर पंकजाताईंनी गायीचे औक्षण व पूजन करून स्वागत केले. राधा व कृष्ण अशी गाय-बैलाची ही जोडी



आहे. दोन्हीच्या पाठीवरून पंकजाताईंनी मायेने हात फिरवला व त्यांना चाराही दिला. कार्यकर्त्यांनी दिलेली ही भेट खरच अनोखी आहे, ही भेट कायम स्मरणात राहील असं त्या म्हणाल्या. यावेळी मुलगा आर्यमानसह उपस्थित सर्व सहकाऱ्यांसोबत पंकजाताईंनी गोमाता आगमनाचा आनंद साजरा केला.

# ना.मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२४ जुलै**

राज्याच्या पर्यावरण, हवामान बदल आणि पशुसंवर्धन मंत्री, जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त शहर भाजपच्यावतीने सामाजिक सेवा उपक्रम सप्ताहा अंतर्गत आज परळी शहरात रस्त्यावर भाजीपाला विक्री करणाऱ्या विक्रेत्यांना पावसापासून संरक्षण मिळावे यासाठी छत्री वाटप, नागरिकांना पर्यावरणपूरक कापडी पिशव्यांचे वाटप, आश्रम शाळा व बिलाल उर्दू प्राथमिक शाळेत वह्यांचे वाटप करणयात आले.

पर्यावरण, हवामान बदल व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसा निमित २१ ते २६ जुलै दरम्यान शहर भाजपच्या वतीने सामाजिक सेवा उपक्रम राबविण्यात येत आहेत. आज बुधवार दि. २३ जुलै रोजी ना. पंकजाताई मुंडे यांच्या संपर्क कार्यालयात भाजीपाला विक्रेत्यांना छत्री वाटप व पर्यावरणपूरक कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून भाजप जेष्ठ नेते, माजी नगराध्यक्ष जुगलकिशोर लोहिया, जेष्ठ नेते शांतीलाल जैन, माजी नगराध्यक्ष वैजनाथ जगतकर, भाजयुमो जिल्हाध्यक्ष निळकंठ चाटे, शहराध्यक्षा उमाताई समशेट्टे, डॉ. शालिनीताई कराड, जेष्ठ नेते श्रीराम मुंडे, प्रकाश जोशी उपस्थित होते. यावेळी बोलताना जुगलकिशोर लोहिया यांनी ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त भाजप शहराध्यक्षा उमाकाकू समशेट्टे यांनी शहर भाजपा च्या वतीने आयोजित केलेल्या सामाजिक उपक्रम कार्यक्रमाचे कौतुक केले. ना. पंकजाताईंचा वाढदिवसाच्या निमित्ताने लाभ व मदत तळागाळातील व गरजू लोकांपर्यंत भाजप कार्यकर्ते पोचवत असल्याचे सांगितले. या कार्यक्रमाचे



प्रास्ताविक अश्विन मोगरकर यांनी केले तर आभार प्रदर्शन विजय दहिवाळ यांनी केले.

यावेळी राजेंद्र ओझा, महादेव इटके, अरुण पाठक, उमेश खाडे, सुशील हरंगुळे, नितीन समशेट्टी, मोहन जोशी, अरुण पाठक, सचिन गित्ते, अनिश अग्रवाल, सारिका कुरिल, प्रशांत कराड, किशोर केंद्रे, योगेश पांडकर, विजय बुंदेले, बाळू फुले, राहुल घोबाळे, बंडू नाना कोरे, श्रीपाद शिंदे, दिलीप नेहरकर, उमेश निळे, अच्युत जोगदंड, कृष्णा बेदरकर, योगेश मुंडे, विराज गित्ते, आदी उपस्थित होते.

# खा.सोनवणेंकडून महामार्ग, रेल्वेसाठी सतत पाठपुरावा; केंद्रीय मंत्र्यांची भेट घेवून मांडले प्रश्न





**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२४ जुलै**

जिल्ह्यातील विविध राष्ट्रीय महामार्गाचे काम तातडीने पुर्ण करावेत, महामार्ग कामे करीत असताना जिथे-जिथे तांत्रिक दोष झालेले आहेत ते दुरुस्त करावेत, भेगा पडलेल्या महामार्गांची दुरूस्ती करावी, अशा विविध मागण्यांसाठी खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची दल्लीत भेट घेतली. यावेळी सततचा पाठपुरावा पाहून मंत्री नितीन गडकरी यांनी पाठ थोपटली. तर जल्ह्यातील रेल्वेच्या संदर्भात केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेवून रेल्वे संदर्भातील विषयावर चर्चा केली. यावेळी मंत्री वैष्णव यांनी रेल्वेसंदर्भाने मांडलेल्या सर्व मागण्यांबाबत सकारात्कता दर्शवली.

# काळेश्वर जाणाऱ्या भाविकांसाठी असर्जन मार्ग खुला: खतगावकर

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.२४ जुलै -**

काळेश्वर जाणाऱ्या भाविकांसाठी विष्णूपुरी गावातून जाण्याची गरज नसून आजपासून असर्जन मार्गे रस्ता खुला करण्यात आला असल्याची माहिती काळेश्वर संस्थानचे अध्यक्ष भास्करराव पाटील खतगावकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

काळेश्वर संस्थानच्या विकासासाठी कोट्यावधीचा निधी प्राप्त झाला असून, या निधीच्या माध्यमातून कामे सुरु आहेत. या परिसरात लहान मुलांसाठी तीन कोटी रुपये खर्च करुन वॉटर स्पोट गेम सुरु करण्यात येणार असून त्याचे काम सुरु आहे. बोटींगसाठी आठ बोटी उपलब्ध होणार आहेत. तसेच काळेश्वर जाणाऱ्या भाविकांची सोय व्हावी यासाठी असर्जन ते विष्णूपुरी गोदावरी नदीवर १९६ कोटी खर्च करुन पुल बांधण्यात आला असून, या पुलामुळे विष्णूपुरी गावातून जाण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे भाविकांनी आजपासून या मार्गाचा अवलंब करावा, असे आवाहन काळेश्वर संस्थानचे अध्यक्ष भास्करराव पाटील खतगावकर यांनी केले. या पत्रकार परिषदेत माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा, काळेश्वर संस्थानचे बालाजी हंबर्डे, उत्तम हंबर्डे, सतीश भेंडेकर आदींची उपस्थिती होती.

# नाममात्र रॉयल्टी, प्रचंड उत्खनन; शासनाची फसवणूक सुरूच!

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि.२४ जुलै -**

नरसीपासून काही अंतरावर असलेल्या गागलेगाव बेळकोणी खुर्द शिवारात मल्लीनाथबाबा मंदिराच्या लगतच्या भूखंडावर मागील चार दिवसांपासून मोठ्या प्रमाणावर मुरुमाचे अवैध उत्खनन सुरू असून, शासनाची फसवणूक करून केवळ नाममात्र रॉयल्टी भरली जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

या भागातील एका मुरुम माफियाने महसूल विभागातील तलाठी आणि मंडळ अधिकाऱ्यांच्या संगनमताने जेसीबी मशिनच्या साहाय्याने ५०० ते ६०० ब्रास मुरुमाचे बेकायदेशीर उत्खनन केले आहे. विशेष म्हणजे, विभागातील महिला तलाठ्यांनी विचारणा केल्यावर याबाबत माहिती नसल्याचे सांगत अनभिज्ञतेचे ढोंग केल्याचे दिसून आले असून, त्यामुळे त्यांच्या भूमिकेवर संशय निर्माण झाला आहे.

गागलेगाव, बेळकोणी खुर्द व कुंभारगाव या तीन गावांच्या सीमेवर वसलेले प्राचीन मल्लिनाथबाबा मंदिर परिसर हे अवैध उत्खननाचे केंद्र बनले आहे. मंदिराच्या आजूबाजूच्या शेतजमिनींमध्ये तीन जेसीबी व २० ते २५ हायवा टिप्पर गाड्यांमार्फत मुरुमाची वाहतूक सर्रासपणे सुरू आहे.

महसूल विभागाचे स्थानिक अधिकारी नाममात्र रॉयल्टी भरून अवैध उत्खननास मूकसंमती देत असल्याचे चित्र दिसत आहे. त्यामुळे महसूल प्रशासनातील काही अधिकारी मुरुम माफियांच्या



आधीन काम करत असल्याचा आरोप स्थानिक सुजाण नागरिकांकडून केला जात आहे.

विशेष म्हणजे, एका कंत्राटदाराला शासनाने उत्खन नासाठी २२ तारखेला परवानगी दिली असताना त्याने त्यापूर्वीच म्हणजे २१ तारखेलाच उत्खनन सुरू केल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे बिलोली महसूल विभागाच्या कार्यपद्धती वरही गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

या पार्श्वभूमीवर संबंधित भूखंडाची ईटीएस मोजणी तातडीने करून, परवानगीपेक्षा किती अधिक मुरुम उत्खनन झाले, याचा तपशील घेणे आवश्यक ठरत आहे. अतिरिक्त गौण खनिज उत्खनन झाल्यास संबंधित रॉयल्टी धारकावर कायदेशीर कारवाई करणे गरजेचे आहे.

मंडळ अधिकारी यांच्या माहितीनुसार, जास्तीत जास्त दंड वसूल करून बेकायदेशीर उत्खनन झालेल्या ठिकाणी 'बोजा' टाकला जाईल, असे सांगण्यात आले आहे. आता तालुका दंडाधिकाऱ्यांकडून या प्रकरणात कितपत कठोर कार्यवाही होते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## संक्षिप्त वृत्त



### मुख्यमंत्री फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त महारक्तदान मेळावा

**लोहा-** भारतीय जनता पक्षाच्या वतीने राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त महारक्तदान मेळावा घेण्याचा संकल्प केला या महारक्तदान मेळाव्यात अनेक नव तरुणानी स्वयंस्फूर्तीने रक्तदान केले. महारक्तादान मेळाव्याचे आयोजक भाजपचे शहर मंडळाध्यक्ष माजी लोकायुक्त नगराध्यक्ष गजानन सावकार सुर्यवंशी, भाजप तालुका ग्रामीण मंडळाध्यक्ष शरद पाटील पवार, तालुका ग्रामीण मंडळाध्यक्ष , चंद्रसेन पाटील सुरनर यांच्या वतीने २२ जुलै रोजी पोलिस स्टेशन समोर महारक्तदान मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात एकूण ५६ रक्तदात्याने रक्तदान करुन मुख्यमंत्र्यांना अनोख्या पध्दतीने वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. या सामाजिक उपक्रमांचे् तालुक्यासह शहरात सर्वत्र कौतुक होत आहे. या महारक्तदान मेळाव्याला भाजपाचे मराठवाडा संघटनमंत्री संजय कौडगे, दक्षिण जिल्हा अध्यक्ष संतुकराव हंबर्डे,जिल्हा सरचिटणीस माणिकराव लोहगावे ,भाजपचे ज्येष्ठ केरबा सावकार बिडवई, दंत्ता शेंबाळे, भाजप मंडळाध्यक्ष कंधारचे गंगाप्रसाद यन्नवार, बालाजी पांडागळे यांनी महारक्तदान मेळाव्याला भेटी देऊन समाधान व्यक्त केले. यावेळी कंधारचे माजी प.स सदस्य उत्तम चव्हाण, माजी नगरसेवक बबनराव निर्मले,नबीसाब शेख,अमोल व्यवाहारे,संदिप दमकोंडावार, पुंडलिक पाटील बोरगांवकर,युवराज वाघमारे,अनिल दाढेल,दिनेश मोटे,डी. एन.कांबळे,दत्ताभाऊ शेटे,सतिश आनेवार,आशिष व्यवाहारे,सतीश आनेवार,सतीश मोरे,कृउबसं डाकोरे, उध्दव पाटील ढेपे,भास्कर पाटील जोमेगावकर, सुभाष कंधारे,मारोती श्रीरामे,आशीष व्यवाहारे, लक्ष्मण फुलवले,वैभव हाक्के, गोविंद वड,संजय चव्हाण, काशिनाथ शेटे,संजय राहाटकर, बालाजी आईनवाडीकर,मारोती कांबळे,निलेश देशमाने,टिकाराम कतुरे,हारीभाऊ वड्डे,शाहारुख शेख,गुलाम शेख,पिनू चुडावकर,व्यंकट दांगटे, मन्मथ नाईकवाडे,संदिप राजकोर, यशपाल निर्मले,नागेश संगवे, इर्शाद चौधरी,व माँ जिजाऊ ब्लड बँकचे कर्मचारी यांनी चांगली मेहनत घेऊन रक्तदान मेळाव्याला प्रतिसाद दिला.

### शकुंतलाबाई उन्हाळे यांचे निधन

**मुदखेड-** मुदखेड शहरातील रहिवाशी सौ.शकुंतलाबाई माणिकराव उन्हाळे यांचे अल्पशा आजाराने दि.२४ जुलै रोजी रात्री निधन झाले आहे कै.सौ.शकुंतलाबाई माणिकराव उन्हाळे यांच्या पार्थीवदेहावर दि.२४ जुलै रोजी सकाळी ११:०० वाजता सीता नदी येथील हिंदु स्मशान भूमी येथे अंत्य संस्कार करण्यात आले. त्या श्रीकांत उन्हाळे व चंद्रकांत उन्हाळे यांच्या मातोश्री होत.



### जगन्नाथ पाटील पांगरगावकर यांचे निधन

**मुदखेड-** मुदखेड येथील जेष्ठ नागरीक जगन्नाथराव देवराव पाटील गाढे पांगरगावकर यांचे दि. २४ जूलै रोजी दुपारी ४:१५ वाजता वृद्धपकाळाने निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ७५ वर्ष होते पश्चात पत्नी, तीन मुले, व दोन मुली, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या पार्थीवदेहावर अंत्यसंस्कार शुक्रवार दि.२५ जूलै रोजी सकाळी १२:०० वाजता सीता नदी येथील हिंदु स्मशान भूमी बारड रोड येथे करण्यात येणार आहे. लोकमत चे पत्रकार संतोष पा.गाढे, कृ.ऊ.बा.स.चे संचालक संदिप पा.गाढे, माधव पा.गाढे यांचे वडील होत.



### मत्स्य शेतकऱ्यांना किसान क्रेडिट कार्ड योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

**नांदेड -** शासनाने मत्स्य शेतकऱ्यांना, मस्त्यसंवर्धकांना त्यांच्या तलाव प्रकल्पास मत्स्यबीज, मत्स्यखाद्य, होडी मत्स्य जाळे इ. अनुषंगिक बाबी खरेदी करण्यास खेळते भांडवल उपलब्ध होण्यासाठी किसान क्रेडीट कार्ड ही योजना सुरु केली आहे. तरी नांदेड जिल्ह्यातील जास्तीत जास्त मच्छिमारांनी किसान क्रेडिट कार्ड योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन मत्स्यव्यवसाय विभागाचे सहाय्यक आयुक्त विक्रम कच्छवे यांनी केले आहे. किसान क्रेडिट कार्ड योजनेत मच्छिमारांना अल्प व्याजदरात रोख रकमेच्या स्वरुपात खेळते भांडवल उपलब्ध होण्यासाठी व या योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय नांदेड यांचे कार्यालय येथे अर्ज स्विकारण्यात येत आहेत.

# ॲट्रासिटी गुन्ह्याच्या तपासात दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यांना निलंबित करण्याची मागणी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.२४ जुलै -**

ॲट्रासिटी गुन्हा दाखल झाल्यानंतरही गुन्ह्याच्या तपासात दिरंगाई करणाऱ्या व गुन्ह्यातील आरोपींना पाठिशी घालणाऱ्या तपास अधिकाऱ्यांना निलंबित करावे, अशी मागणी दलित पँथरचे अहमदपूर तालुकाध्यक्ष महादेव बनसोडे यांनी एका निवेदनाव्दारे जिल्हा पोलीस अधीक्षकाकडे केली आहे.

राणी लक्ष्मीबाई शिक्षण संस्थे अंतर्गत असलेल्या शिवनिकेतन प्राथमिक शाळा यशवंतनगर येथे व्ही.बी.बनसोडे या सहशिक्षिका म्हणून मागील ३० वर्षापासून कार्यरत आहेत. संस्थेचे सचिव, मुख्याध्यापक व अन्य पदाधिकाऱ्यांनी व्ही.बी.बनसोडे यांच्या पगारीतून २५ टक्के रक्कम दरमाह वसुली केली आहे. सध्या त्यांची मुले मोठी झाल्याने त्यांनी दरमहा २५ टक्के रक्कम देणे शक्य नसल्याची विनंती संस्थेच्या सचिवाकडे केली होती. परंतु या मागणीनंतर संस्थेचे संस्थाचालक यांनी व्ही.बी.बनसोडे यांना जातीवाचक शब्द वापरल्याने त्यांच्याविरुध्द शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याच्या तपासासंदर्भाने फिर्यादी बनसोडे यांनी दरमहा पगारीतील २५ टक्के रक्कम मागितल्याबाबत मोबाईल संभाषण पेन ड्राईव्ह स्वरुपात दाखल केले आहे. असे असतानाही गुन्ह्यातील तपास अधिकारी आरोपींना पाठिशी घालण्याचा प्रयत्न करत असून, या तपास अधिकाऱ्यांना तात्काळ निलंबित करावे, अन्यथा दि.१३ ऑगस्टपासून धरणे आंदोलन करण्याचा इशारा दलित पँथरचे तालुकाध्यक्ष महादेव बनसोडे यांनी दिला आहे.

# भोकर तालुक्यातील अवैध गिट्टी मशीन बंद करण्याची मागणी

**तभा वृतसेवा**
**भोकर, दि.२४ जुलै -**

आदिवासी विकास संघ महाराष्ट्र राज्याचे महाराष्ट्र प्रदेश महासचिव विजय मोरे यांनी उपविभागीय अधिकारी यांना दि.२२ जूलै रोजी दिलेल्या निवेदनामध्ये म्हटले आहे की, सध्या भोकर शहरातील विविध खेडयात अवैध गिट्टी मशीन चालू आहेत. यात रायखोड, पोंमनाळा, चिंचाळा, खेडयाच्या आसपास असणाऱ्या या मशीन मुळे आणि त्यांच्या धूळी मुळे शेतीचे आणि विहिरीचे अतोनात नुकसान होत आहे. शेतात उभ्या पिकाचे नुकसान झाले आहे. व होत आहे. तसेच ब्लास्टिनगमुळे भूकंप झाल्याचा भास होत आहे, त्यामुळे बोअरवेलचे पाणी कमी होत आहे. व पान्याच्या मोटारी फसुन बसत आहेत. तर ज्या शेतकऱ्याना विहिरी आहेत, त्यांचे पाणी कमी होत आहे. तसेच ब्लास्टिनगच्या बारुदमुळे नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परीणाम होत आहे.

प्रत्यक्ष गावात जावून तेथील नागरीकांना विचारुन ग्रामसभा घेऊन ह्या अवैद्य मशीनी तात्काळ बंद कराव्यात. अन्यथा आपल्या कार्यालया समोर लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करावे लागेल. याची नोंद घ्यावी. असे निवेदनामध्ये म्हटले असून निवेदनाच्या प्रती जिल्हाधिकारी नांदेड आणि तहसीलदार भोकर यांना देण्यात आल्या आहेत.

# *रोजगार मेळाव्यात ३९ उमेदवारांची अंतिम निवड*

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.२४ जुलै -**

नांदेड जिल्ह्यातील युवक-युवतीना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी यासाठी जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रामार्फत यशवंत महाविद्यालयात २२ जुलै रोजी पंडित दिनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यात जिल्ह्यातील १९० उमेदवारांची प्राथमिक निवड तर ३९ उमेदवारांची अंतिम निवड करण्यात आली.

या रोजगार मेळावा कार्यक्रमाच्या अध्यक्षा आमदार श्रीजया अशोकराव चव्हाण तर प्रमुख पाहुण्या गोदावरी समुहाच्या अध्यक्षा राजर्षी ताई पाटील या होत्या. जीवन एक शर्यत असून, या शर्यतीतून अनेक गोष्टीत बदल होत असतात. इथं जी संधी उपलब्ध करुन दिली आहे, त्या संधीचा लाभ सर्व युवक-युवतीनी घ्यावा, असे आवाहन आमदार श्रीजया चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना केले.

शिक्षण घेत असताना गुरुजणांचा विचार करा, समाजात वागताना आईवडीलांच्या विचार करा, आयुष्यात मिळालेल्या संधीच सोन करा असा संदेश गोदावरी समुहाच्या अध्यक्षा राजर्षी ताई पाटील दिला. सध्या या जगात कौशल्यांला मागणी आहे. प्रत्येकाने आपल्यातले कौशल्य विकसित करण्यावर भर द्यावा. आधुनिक जगात कौशल्याशिवाय प्रगती अशक्य असल्याचे मत कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता विभागाचे सहाय्यक आयुक्त डॉ. रा.म.कोल्हे यांनी केले.

# हदगाव भाजपाची सर्वधर्म समावेशक शहर मंडळ कार्यकारिणी जाहीर

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि.२४ जुलै -**

भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनानुसार तर नांदेड उत्तर जिल्हाध्यक्ष किशोर देशमुख यांच्या सूचनेनुसार आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपाचे तालुकाध्यक्ष बाळा पाटील यांनी शहर मंडळ सर्व धर्मसमावेशक असलेली कार्यकारणी जाहीर केली असून ज्यात शहर मंडळ तालुका उपाध्यक्षपदी सहा जण, शहर मंडळ तालुका सरचिटणीस पदी दोन जण, चिटणीस पदी



सहा जण तर कोषाध्यक्ष व इतर मोर्चा अध्यक्षापदी अशी २६ पदाधिकाऱ्यांची कार्यकारणी जाहीर करण्यात आली असून नव्याने घोषित केलेल्या या कार्यकारणीमुळे पक्ष संघटन अधिक बळकट होणार असून पक्षाची ताकद शहरातील प्रत्येक प्रभागात वृद्धिंगत होईल असा ठाम विश्वास बाळा पाटील यांनी यावेळी व्यक्त केला.

जिल्ह्यातील भाजपा जिल्हाध्यक्ष ,मंडळ अध्यक्ष यांच्या नियुक्तीनंतर संपूर्ण कार्यकारिणीची नियुक्तीकडे भाजपा कार्यकर्त्यांचे लक्ष लागले होते त्यानुसार तालुका अध्यक्ष बाळा पाटील यांनी शहर मंडळ कार्यकारणी पुढील प्रमाणे जाहीर केली ज्यात शहर मंडळ उपाध्यक्ष म्हणून विद्याधर देशमुख, सलीम पटेल, रसूल कुरेशी, सौ. कल्पना देशमुख, सो. ज्योति शिंगणवार, आकाश जाधव, तालुका सरचिटणीस पदी बालाजी शंकुरवार, संतोष कांबळे, चिटणीसपदी गोविंद कळसे, अशोक देशमुख, गजानन लकडे ,अजय राऊत, नितीन आडे गजानन मेटकर, कोषाध्यक्ष म्हणून शिवदास वेमुल्ला, महिला मोर्चा अध्यक्षपदी श्रीमती सुजाता सोनुले , ओबीसी मोर्चा अध्यक्षपदी विजय डूरके, युवा मोर्चा अध्यक्षपदी साई बाभुळकर, किसान मोर्चा अध्यक्षपदी विलास महाजन, अनु. जाती मोर्चा अध्यक्षपदी किशन कांबळे, अल्पसंख्याक मोर्चा अध्यक्षपदी मोहम्मद रफीक, सोशल मीडिया अध्यक्षपदी सुदीप जाधव,आयटी सेल अध्यक्षपदी सौरभ स्वामी, शिक्षक आघाडी अध्यक्षपदी भाऊराव डोरले सर, पंचायत राज व ग्रामविकास समिती अध्यक्षपदी अंजान तलवारे, अध्यात्मिक आघाडी अध्यक्षपदी माधव गिरी यांची निवड जाहीर करण्यात आली. यावेळेस तुकाराम चव्हाण, आनंदराव भंडारे, शिरीष मनाठकर, सुरेश सारडा, उमाकांत भोरे, बापूसाहेब देशमुख यांच्या सह बूथ प्रमुख, शक्ती केंद्रप्रमुख व कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# दिव्यांग बांधवांच्या मानधनात वाढ ; मुदखेड शहरात जल्लोष

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि.२४ जुलै -**

मुदखेड शहरातील दिव्यांग बांधवांचे मानधन वाढ झाल्याबद्दल प्रहार दिव्यांग क्रांती संघटनेच्या वतीने जल्लोष साजरा करण्यात आला.

दिव्यांग बांधवांच्या मानधनात वाढ करावी म्हणुन आमदार बच्चु भाऊ कडू यांनी अनेक वर्षापासून दिलेल्या लढयाला यश मिळाले असल्यामुळे मुदखेड शहरातील दिव्यांग बांधवांच्या वतीने सर्व प्रथम शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या फलकास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यानंतर छत्रपती शिवाजी महाराज चौक याठिकाणी दिव्यांग बांधवाकडून पेढे मिठाई वाटप करून फटाक्याची अतिषबाजी करीत आनंद उत्सव साजरा करण्यात आला.

दिव्यांग बाधवांकडून ६ हजार रुपयाची मागणी होती पण सरकारने १ हजार रुपये तटपुंजी मानधन देऊन दिव्यांग बाधवांना दिलासा दिला.

आत्ता दिड हजार ऐवजी अडीच हजार मानधन देण्यात येईल अशी घोषणा महाराष्ट्र शासनाच्या वतीने करण्यात आली आहे. दिव्यांगाच्या मानधनात वाढ करावी म्हणुन गेल्या अनेक वर्षापासूनं प्रहार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष बच्चु भाऊ कडू यांनी राज्यभर आंदोलने केली होती रायगड येथिल अन्नत्याग आंदोलन मोझरी येथील उपोषण पाबळ ते आंबोडा येथील १३८ पायदळ आंदोलनाची दखल घेत महाराष्ट्र शासनाने दिव्यांगाच्या मानधनात एक हजार रुपयाची वाढ केली असून यानंतर दिव्यांग बांधवांना मानधन अडीच हजार मिळणार आहे. म्हणून सर्व दिव्यांग बांधवांकडून बच्चु भाऊ कडू यांचे आभार मानण्यात आले.

यावेळी प्रहार जिल्हाध्यक्ष पंढरीनाथ हुंडेकर, जिल्हा उत्तर - दक्षिण सचिव मारोती मंगरुळे,शिवलिंग माटोरे, प्रहार युवा नेते गजाननं चव्हाण, प्रहार ता.अध्यक्ष माधव पांचाळ,नायगाव ता.अध्यक्ष साईनाथ बोईनवाड,माजी ता.अध्यक्ष अनिल शेटे पा.,ता.सचिव निवडंगे, उमरी महिला अध्यक्ष संगीता बामणे,एसवंत पवार पा.,मिलिंद कागडे,यासह प्रहार कार्यकर्ते व निराधार महिला,शेतकरी वर्ग बहुसंख्येंनी उपस्थित होते.

# वार्ड क्रमांक १ मध्ये 'श्री कपिल नगर' नावाचे नामफलक बसवा : विजयसिंह हजारी

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि.२४ जुलै -**

नगरपंचायत माहूर अंतर्गत शहरातील सर्व वार्डात सार्वजनिक ठिकाणी नाम फलक लावण्यात येत असून, त्याच अनुषंगाने वार्ड क्र.१ मध्ये 'श्री कपिल नगर' या नावाने नाम फलक बसविण्यात यावे, अशी मागणी युवासेना शहर प्रमुख विजयसिंह हजारी यांनी माहूर नगरपंचायतचे मुख्याधिकारी यांचेकडे दि. २३ जुलै रोजी एका निवेदनाद्वारे केली आहे.

पूर्वीची ग्रामपंचायत व आत्ताची नगरपंचायत असलेल्या माहूर शहरातील स्थानिक रहिवाशांनी वार्डाला आपापल्या सोयीनुसार वेगवेगळ्या प्रकारची नावे दिली जी आजतागायत बव्हंशी सार्वजनिक वापरात आहेत.विशेष म्हणजे पुढे हिच नावे निवडणूक विभागाच्या मतदार यादीतही जशीच्या तशी वापरल्या जात आहे. आता याबाबत दस्तूरखुद्द नगरपंचायत प्रशासनाने लक्ष घातले असून, मंजूर करण्यात आलेल्या ठरावानुसार नगरपंचायत अंतर्गत च्या सर्व १७ ही वार्डातील सार्वजनिक ठिकाणी त्या वार्डाची रितसर वैशिष्ट्यपूर्ण ओळख म्हणून नामफलक बसवण्याचे अभिनंदनीय काम



हाती घेण्यात आले आहे.

तदनुसार शहरातील वार्ड क्रमांक ०१ ला सुद्धा येथील स्थानिक रहिवाशांच्या मागणीनुसार त्यांच्या पसंतीचे श्री कपिल नगर या नावाचे नामफलक नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक व कपिलेश्वर धर्मशाळा यामधील मुख्य सार्वजनिक चौकात बसवण्याची मागणी स्थानिकांमधून जोर धरू लागली आहे.

माहूर शहरातील वार्ड क्रमांक ०१ मध्ये सुद्धा भगवान श्री शंकराचे प्रसिद्ध आणि जागृत असे कपिलेश्वर मंदिर असल्याने या परीसरातील रहिवाशांच्या जनभावनेचा आदर करुन राष्ट्रीय महामार्गालगतच्या नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक व कपिलेश्वर धर्मशाळा या मधील मुख्य सार्वजनिक चौकात श्री कपिल नगर या नावाने नामफलक मंजूर करुन तो तातडीने बसविण्याची मागणी येथील नागरिकांच्या वतीने युवासेना शहर प्रमुख विजयसिंह हजारी यांनी निवेदनाद्वारे नगरपंचायत प्रशासनाकडे केली आहे.

या निवेदनावर युवासेना शहर प्रमुख विजयसिंह हजारी यांचेसह नितीन कुमार राठोड, राजुसिंग राठोड, राजाराम पस्पुलवार, डॉ.पद्माकर जगताप, सोमेश दुबे, रितेश दुबे, गोतम मेहता, योगेश माळवे,ज्योतीराम माळवे, उमेश सोनकुसरे,पवन शर्मा, साई नारलावार, अन्नपूर्णा माळवे, प्रशांत सोनकुसरे, अरुण सोनकुसरे, रवि पराते या नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# खुतमापूर रस्त्याच्या दुरुस्तीसाठी ठिय्या आंदोलनाचा इशारा

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि.२४ जुलै -**

तालुक्यातील खुतमापूर ते खुतमापूर फाटा या सुमारे दीड किलोमीटर आंतराच्या रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून, या बाबत वारंवार तक्रारी करूनही सार्वजनिक बांधकाम विभागाने दखल न घेतल्याने ग्रामस्थांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. दि.१० ऑगस्टपर्यंत रस्त्याच्या दुरुस्तीचे काम सुरू न झाल्यास ११ ऑगस्टपासून सार्वजनिक बांधकाम विभाग देगलूर येथील कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन छेडण्याचा इशारा



ग्रामपंचायतीने दिला आहे.

या मार्गावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले असून, दोन्ही बाजूंनी वाढलेल्या झुडपामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे. विशेषतः रमतापूर, कोकलगाव आणि खुतमापूर या गावांतील विद्यार्थी दररोज हणेगाव येथे शाळा महाविद्यालय आदी शिक्षण घेण्यासाठी ये - जा करतात. रस्त्याच्या बेहाल अवस्थेमुळे त्यांची मोठी दमछाक होत असल्याने पालकांमध्येही नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

खुतमापूर ग्रामपंचायततीचे सरपंच बालाजी मारोतीराव चोपडे यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य श्रावण ठावरे, विष्णू शिंगटे, सामाजिक कार्यकर्ते प्रशांत वलकले, सचिन गायकवाड यांच्या स्वाक्षारीने मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, देगलूर यांना सादर करण्यात आलेल्या निवेदनात, सदरील कामाची प्रत्यक्ष पाहणी करून काम सुरू करण्यात यावे अशी मागणी करण्यात आली अन्यथा गावकरी एकत्र येत मोठ्या संख्येने ठिय्या आंदोलन छेडतील, असा स्पष्ट इशारा निवेदनातून देण्यात आला आहे.

**जाहिर प्रगटन**

नोंदिचा प्रकारःखरेदी
माहिती मिळालेचा दि.२३/०७/२५
फेरफाराचा दि.२४/०७/२५

लिहून देणारःपठाण सोहेलखान बंदेअलीखान रा.भोकर (खाता क्र.१०६६८)यांचे गट/सर्व्हे क्रमांक ५५४लागवडी योग्य क्षेत्र ०.८२१३हे.आर.चौ.मी पैकी लागवडी योग्य क्षेत्र ०.००४८हे.आर.चौ.मी.आणि पोटखराब क्षेत्र ०.००००हे.आर.चौ.मी.हे त्यांनी गट क्र.५५४मध्ये प्लॉटिंग असून कै.बंदेअलीखान पठाण घूडूखान पठाण यांनी हयात असताना खरेदी दस्त क्रमांक ३७ दि.१०/०१/२०२०रोजी अरुण नरसिंगराव डोईफोडे यांना विक्रि केला होता आज रोजी त्यांच्या वारसाच्या नावे आहे करिता नोंद घेण्यात आली.

लिहून घेणारःअरुण नरसिंगराव डोईफोडे(खाता क्रमांक १०७५३) गट/सर्व्हे क्रमांक५५४ लागवडीयोग्य क्षेत्र ०.००४८हे.आर.चौ.मी.आणि पोटखराब क्षेत्र ०.००००हे.आर.चौ.मी.यांना दूय्यम निबंधक भोकर जिल्हा नांदेड यांचेकडील खरेदी दस्त क्रमांक३७दि.१०/०१/२०२०प्रमाणे रक्कम रुपये ७५००० घेवून खरेदी दिली.सबब खरेदी घेणाऱ्याचे नाव गाव नमूना नं ७/१२वर दाखल केले.फेरफारात हितसंबध आहे असे अधिकार अभिलेखावरुन फेरफाराच्या नोंदवहिवरुन मला वाटते उक्त फेरफारात तूमचा हितसंबध आहे असे मानण्यास संयूक्तिक कारण आहे.उपरोक्त जमिन आहे त्या गावचा ग्राम महसूल अधिकारी याद्वारे सूचना देत आहे हि सूचना मिळाल्यापासून पंधरा दिवसाच्या आत नोंदिसंबधी तूमची हरकत कोणतीही असल्यास ती तोंडी अथवा लेखी पाठविण्या फर्मावित आहे पंधरा दिवसाच्या आत कोणतीही हरकत त्यांचेकडे न मिळाल्यास उक्त नोंदीस तूमची संमती आहे असे गृहित धरले जाईल.

**ग्राम महसूल अधिकारी**
**तलाठी साझा भोकर.**

**जाहिर प्रगटन**

नोंदिचा प्रकारःखरेदी
माहिती मिळालेचा दि.२२/०७/२५
फेरफाराचा दि.२४/०७/२५

लिहून देणारःशामराव गोविंदराव देशपांडे रा.भोकर (खाता क्र.७७२)यांचे गट/सर्व्हे क्रमांक २३४लागवडी योग्य क्षेत्र ०.५८४८हे.आर.चौ.मी पैकी लागवडी योग्य क्षेत्र ०.०६०९ हे.आर.चौ.मी.आणि पोटखराब क्षेत्र ०.००००हे.आर.चौ.मी. हे त्यांनी

संमती देणारे खातेदारःभूषण शामराव देशपांडे(खाता क्रमांकः-०),गौरव शामराव देशपांडे(खाता क्र.०)लिहून घेणारःसूशिल शिवराम मूगावे(खाता क्रमांक १०७४७) गट/सर्व्हे क्रमांक२३४ लागवडीयोग्य क्षेत्र ०.०६०९हे.आर.चौ.मी. आणि पोटखराब क्षेत्र ०.००००हे.आर.चौ.मी.यांना दूय्यम निबंधक भोकर जिल्हा नांदेड यांचेकडील खरेदी दस्त क्रमांक ९२४ दि.३६/०५/२०१४ प्रमाणेरक्कम रुपये ५००००० घेवून खरेदी दिली.सबब खरेदी घेणाऱ्याचे नाव गाव नमूना नं ७/१२वर दाखल केले.फेरफारात हितसंबध आहे असे अधिकार अभिलेखावरुन फेरफाराच्या नोंदवहिवरुन मला वाटते उक्त फेरफारात तूमचा हितसंबध आहे असे मानण्यास संयूक्तिक कारण आहे.उपरोक्त जमिन आहे त्या गावचा ग्राम महसूल अधिकारी याद्वारे सूचना देत आहे हि सूचना मिळाल्यापासून पंधरा दिवसाच्या आत नोंदिसंबधी तूमची हरकत कोणतीही असल्यास ती तोंडी अथवा लेखी पाठविण्या फर्मावित आहे पंधरा दिवसाच्या आत कोणतीही हरकत त्यांचेकडे न मिळाल्यास उक्त नोंदीस तूमची संमती आहे असे गृहित धरले जाईल.

**ग्राम महसूल अधिकारी**
**तलाठी साझा भोकर.**